रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १९ • अंक २६

www.ramprahar.com

बुधवार, १२ ऑगस्ट २०२६ • पाने ८ • किंमत ₹२

## अंतरंग

‘स्वरतिरंगा’मधून घुमणार देशभक्तीचा सुरेल जल्लोष/२

ड्रग्जमुक्त रायगड अभियानाचा शुभारंभ/६

तायक्वांडो चॅम्पियनशिपसाठी पनवेलच्या खेळाडूंची निवड/८

## मिसिंग लिंकची पुणे-मुंबई मार्गिका आज तीन तास बंद



**मुंबई :** यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंकची पुणे–मुंबई मार्गिका दुरूस्तीचे काम आणि मॉक ड्रिलमुळे बुधवारी (दि.१२) दुपारी १२ ते ३ अशी तीन तासांसाठी बंद राहणार आहे. एक्स्प्रेस वेवरील वाहतूक कोंडी आणि पर्यायाने प्रवासाचा कालावधी कमी करण्यासाठी मिसिंग लिंकची रचना करण्यात आली आहे. जुलै महिन्यात मुसळधार पावसात झालेल्या एका मोठ्या भूस्खलनामुळे हा मार्ग सुमारे १८ तास बंद ठेवण्यात आला. सुरक्षा तपासणी पूर्ण झाल्यावर हा मार्ग नंतर पुन्हा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला होता. या महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या एका प्राणघातक अपघातानंतर अधिकाऱ्यांनी या कॉरिडॉरवरील निगराणीही वाढवली आहे. आता बुधवारी पुण्याहून मुंबईकडे जाणारी मार्गिका तीन तास बंद असेल. या कालावधीत पुण्यावरून मुंबईकडे येणाऱ्या वाहनांना द्रुतगती मार्गाच्या जुन्या घाट विभागाकडून वळविण्यात येणार आहे.

# कॅबिनेट बैठकीत विविध निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी (दि.११) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत भूसंपादनाचा मोबदला, ऊर्जा प्रकल्प, कृषी विभागात निर्मितीस मान्यता तसेच इतर निर्णय घेण्यात आले.

राज्यात नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना गती मिळावी यासाठी नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांकरिता खरेदी करण्यात आलेल्या जमिनीच्या हस्तांतरण शुल्कात २५ टक्के सूट देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. नवीकरणीय उर्जा प्रकल्पांसाठी मुख्य कंपनीद्वारे प्रथमतः जमीन खरेदी करताना देय मुद्रांक शुल्काचा भरणा करण्यात येतो, मात्र त्यानंतर स्थापन करण्यात येणाऱ्या ग्रुप कंपनी किंवा स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) कंपनीद्वारे या जमिनीच्या होणाऱ्या हस्तांतरणात द्यावे लागणारे मुद्रांक शुल्क पूर्ण माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या अखत्यारितील कृषी आयुक्तालयात एक संचालक, दोन सहसंचालक आणि एक अपर संचालक अशा चार पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यात आली. राज्यात कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर खासगी कौशल्य विद्यापीठांची स्थापना करण्याच्या नियमांमध्ये बदल करण्यास व त्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना काढण्यास मान्यता देण्यात आली.

### विलंबित भूसंपादन मोबदल्याच्या व्याजदरात सुधारणा

भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना दिल्या जाणाऱ्या मोबदल्यास विलंब झाल्यास त्यावर दिल्या जाणाऱ्या व्याजामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. आता हा व्याजदर रिझर्व्ह बँक व्यावसायिक बँकांना ज्या व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देते, त्यापेक्षा एक टक्का अधिकचा असणार आहे. त्यासाठी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३चे कलम ७२मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.



# पनवेल महानगरपालिकेत भाजप महायुतीचे वर्चस्व कायम

## चारही प्रभाग समित्यांवर उमेदवार विजयी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका प्रभाग समित्यांच्या सभापतिपदाची निवडणूक मंगळवारी (दि.११) पार पडली. या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष महायुतीच्या उमेदवारांनी सर्व चारही प्रभाग समित्यांवर विजय मिळवत महापालिकेवरील आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पीठासीन अधिकारी तथा रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.



१० ऑगस्ट रोजी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन अर्जांच्या छाननी प्रक्रियेनंतर नियमानुसार ही निवड प्रक्रिया राबवण्यात आली. यामध्ये प्रभाग समिती ‘अ’मधून भाजप महायुतीचे रवींद्र भगत १३ मते मिळवून विजयी झाले, तर प्रतिस्पर्धी योगिता फडके यांना अवघी चार मते पडली. प्रभाग समिती ‘ब’मधून मधू पाटील आणि प्रभाग समिती ‘क’मधून रवींद्र जोशी यांचा प्रत्येकी एकच अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली, तर प्रभाग समिती ‘ड’साठी झालेल्या मतदानात अजय बहिरा यांनी १९ मते मिळवत विजय मिळवला, तर प्रतिस्पर्धी मनीषा म्हात्रे यांना फक्त तीन मते पडली.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी निकाल घोषित करताच परिसरात भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांनी ढोल–ताशांच्या गजरात जल्लोष केला. महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, जिल्हाधिकारी किशन जावळे, आयुक्त मंगेश चितळे यांच्यासह नगरसेवक–नगरसेविकांनी नवनिर्वाचित सभापतींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी शहरातून भव्य विजयी मिरवणूक काढली. या मिरवणुकीदरम्यान नवनिर्वाचित सभापतींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

## हर घर तिरंगा अभियानात सहभागी व्हा -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारताचा ८०वा स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट रोजी साजरा होणार आहे. देशभरात त्याची तयारी सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना हर घर तिरंगा अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होत स्वातंत्र्य दिन अभिमानाने आणि उत्साहाने साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

पंतप्रधान मोदींनी मंगळवारी (दि.११) सोशल मीडियावर व्हिडीओ संदेश शेअर केला. यामध्ये त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली अर्पण करून विकसित भारताचे ध्येय पुढे नेण्यासाठी नागरिकांनी संकल्प करावा, असे सांगितले. त्याचप्रमाणे प्रत्येक घरावर तिरंगा फडकवून स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवात सहभागी व्हा, असेही म्हटले.

भारत सरकारकडून यंदा हर घर तिरंगा अभियान ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्टदरम्यान राबवले जात आहे. या मोहिमेचा उद्देश नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना वाढवणे आणि राष्ट्रध्वजाबद्दल आदर निर्माण करणे हा आहे. या काळात नागरिकांना आपल्या घरावर तिरंगा फडकवण्यास किंवा सन्मानपूर्वक प्रदर्शित करण्यास प्रोत्साहित केले जात आहे.

या अभियानात नागरिक डिजिटल पद्धतीनेही सहभागी होऊ शकतात. तिरंग्यासोबतचा फोटो ऑनलाइन शेअर करून मोहिमेत सहभाग नोंदवता येतो. तिरंग्यासोबतचा फोटो अपलोड केल्यानंतर डिजिटल प्रमाणपत्र मिळवण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## तलासरीत तरुणीवर सामूहिक अत्याचार

### तिघे ताब्यात

**तलासरी : प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्याच्या तलासरीमध्ये एका १९ वर्षीय आदिवासी तरुणीवर पाच जणांनी सामूहिक अत्याचार केल्याची घटना रविवारी रात्री घडली. याप्रकरणी पोलिसांनी जलद पावले उचलत तीन संशयित आरोपींना ताब्यात घेतले असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पीडित तरुणी कुटुंबीयांशी पटत नसल्यामुळे काही दिवसांपासून मैत्रिणीच्या घरी राहत होती. ९ ऑगस्ट रोजी ती प्रियकरासोबत गुजरातमध्ये फिरायला गेली होती. परतीच्या प्रवासात त्यांची दुचाकी घसरली. या परिस्थितीचा तरुणांनी गैरफायदा घेत तरुणीवर अत्याचार केला. या प्रकरणातील एका आरोपीला पोलिसांनी न्हावा शेवा बंदराजवळून ताब्यात घेतले. त्याने दिलेल्या माहितीवरून दोन आरोपीना ताब्यात घेण्यात आले असून अन्य तीन आरोपींच्या शोधात पोलीस पथके रवाना झाली आहेत.

## निवडक

### हिमाचलमध्ये पावसाचे थैमान; मोठी जीवित आणि वित्तहानी

**मंडी :** हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. ताज्या अहवालानुसार राज्यात पूर, भूस्खलन आणि रस्ते अपघातांच्या घटनांमध्ये आतापर्यंत तब्बल १५५ जणांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय २५९ मुख्य रस्ते वाहतुकीसाठी बंद झाले आहेत, तर २५५ ट्रान्सफॉर्मर्स ठप्प झाल्याने अनेक भाग अंधारात गेले आहेत. मुसळधार पावसामुळे पायाभूत सुविधा, शेती आणि खासगी मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

### मून बेस मोहिमेसाठी ‘नासा’चे ‘इस्रो’ला निमंत्रण

**बंगळुरू :** चंद्रावरील मानवाचे पहिले कायमस्वरूपी तळ (आउटपोस्ट) म्हणून संकल्पित असलेल्या ‘नासा’च्या महत्त्वाकांक्षी मून बेस कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी अमेरिकेने भारताला निमंत्रित केले आहे. बंगळुरू येथील ‘इस्रो’च्या मुख्यालयात झालेल्या भारत–अमेरिका स्पेस जॉइंट वर्किंग ग्रुपच्या बैठकीदरम्यान हे निमंत्रण देण्यात आले. भारत–अमेरिका अंतराळ सहकार्याचा हा एक नवीन आणि महत्त्वपूर्ण अध्याय ठरू शकतो.

# झारखंडमधील विद्यार्थी मारहाणीवर राज-उद्धव ठाकरे गप्प का?

## मंत्री आशिष शेलार यांचा सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

झारखंडची राजधानी रांची येथे नोकरभरती प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या तरुण–तरुणी आणि विद्यार्थ्यांवर तेथील सरकारने केलेल्या अमानुष लाठीहल्ला केला. यावर उद्धव आणि राज ठाकरे यांची बोलती का बंद आहे, असा सवाल भाजप नेते आणि मंत्री आशिष शेलार यांनी मंगळवारी (दि.११) उपस्थित केला. झारखंडमध्ये काँग्रेस सत्तेत सहभागी असल्यानेच या दोन्ही नेत्यांनी मौन बाळगले असून 'मातोश्री' आणि 'शिवतीर्थ'वरून स्वतःच्या राजकीय सोयीची भूमिका घेतली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत मंत्री शेलार बोलत होते. रांची येथे नोकरभरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत विद्यार्थ्यांनी आंदोलन पुकारले आहे. या आंदोलकांवर तेथील प्रशासनाने अत्यंत क्रूरपणे बळाचा वापर केला. रांचीमध्ये विद्यार्थ्यांवर अमानुष हल्ला करणारे हे विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीतीलच हल्लेखोर आहेत. यामुळे



काँग्रेसला आता देशाला तोंड दाखवायला जागा उरलेली नाही. काँग्रेस आणि राहुल गांधी यांची या संपूर्ण प्रकरणात दुटप्पी भूमिका उघडी पडली आहे, असे ना. शेलार म्हणाले.

रांचीमध्ये ज्यांच्यावर अन्याय झाला, ते तरुण–तरुणी आणि विद्यार्थी आपले नाहीत का? महाराष्ट्रात प्रत्येक लहान–मोठ्या मुद्द्यावर बोलणाऱ्या राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचे दरवाजे या प्रकरणात का बंद आहेत? विरोधकांनी नेहमीच विद्यार्थ्यांच्या हिताचा बळी देऊन आपल्या राजकीय पोळ्या भाजण्याचे काम केले आहे. हेच त्यांचे मूळ धोरण असल्याने सध्या संसदेतही विरोधकांकडून नौटंकी आणि गोंधळ घालण्याचे काम सुरू आहे. आम्ही उद्धव ठाकरेंना रांचीचे विमानाचे तिकीट काढून पाठवायला तयार आहोत, त्यांनी तिथल्या पीडित विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहून दाखवावे, असे आव्हान ना. शेलार यांनी यावेळी दिले.

झारखंडमधील या घोटाळ्याविरोधात पारदर्शकता मागणाऱ्या मुलांवर तिथल्या सरकारने शत्रूसारखा हल्ला केला आहे. महिला उमेदवारांवर लाठीचार्ज करणे, अश्रूधूर सोडणे आणि आंदोलकांभोवती तारेचे कुंपण घालणे ही अत्यंत क्रूर आणि अमानुष पद्धत आहे. तिथे 'जेएमएम'सोबत (झारखंड मुक्ती मोर्चा) काँग्रेसही सत्तेत समान वाटेकरी आहे. मग हे शांततापूर्ण आंदोलन दडपण्यासाठी अमानुष बळाचा वापर कोणाच्या इशाऱ्यावर झाला? राहुल गांधी आता तिथल्या मुख्यमंत्र्यांचा राजीनामा घेणार की स्वतः आपल्या पदाचा राजीनामा देणार? असा सवालही ना. शेलार यांनी केला.

# गरजू विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनी मिळणार शालोपयोगी साहित्य

## एनडी स्टुडिओमध्ये सेवाभावी उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षण हेच खरे सामर्थ्य या विचारातून समाजातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला बळ देण्यासाठी अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने हजारो विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग, छत्री आणि वह्यांचे वाटप करण्यात येणार आहे. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून शनिवारी (दि. १५) सकाळी ११ वाजता कर्जत फाट्याजवळील एन.डी. स्टुडिओ येथे या भव्य सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास राज्याचे कॅबिनेट मंत्री ॲड. आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे आणि माजी आमदार देवेंद्र साटम उपस्थित राहणार आहेत.

आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत तसेच त्यांना शैक्षणिक साहित्याची कमतरता भासू नये या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देऊन उज्ज्वल भविष्यासाठी हातभार लावण्याचा हा प्रयत्न असल्याचे आयोजक अशोक छाजेड यांनी सांगितले.

या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध होणार असून त्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात नागरिकांनी, विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन अशोक छाजेड चॅरिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष ॲड. संतोष खांडेकर यांनी केले आहे.

# येवला पैठणीचा राष्ट्रीय गौरव

## राष्ट्रपतींच्या हस्ते विशेष टपाल तिकिट प्रकाशित

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरेची जगभर ओळख निर्माण करणाऱ्या येवला पैठणीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. नवी दिल्ली येथील राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रात आयोजित १२व्या राष्ट्रीय हातमाग दिनाच्या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते महाराष्ट्राची अस्मिता आणि येवल्याच्या समृद्ध हातमाग परंपरेचे प्रतीक असलेल्या येवला पैठणीच्या स्मरणार्थ विशेष टपाल तिकिट प्रकाशित करण्यात आले.




येवल्याच्या हातमाग व्यवसायाला मोठी ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. विणकर समाजातील कारागीरांनी आपल्या पूर्वजांकडून मिळालेली विणकामाची कला जपत ती पुढील पिढीपर्यंत पोहचविली आहे. येवला पैठणी ही केवळ एक साडी नाही, तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची, कलात्मकतेची आणि कुशल हातांची ओळख आहे. हातमागावर अत्यंत बारकाईने, संयमाने आणि कौशल्याने विणली जाणारी पैठणी आज देशाच्या सर्वोच्च स्तरावर पोहचली आहे.

## रूद्राभिषेक सोहळा



**पनवेल : भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खारघर भाजपच्या वतीने मंगळवारी विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत सेक्टर १२मधील प्रसिद्ध शिवमंदिरात भव्य रूद्राभिषेक सोहळा झाला. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतः उपस्थित राहून पूजा–अर्चेसह रूद्राभिषेक केला. यावेळी भाजप नेते संतोष शर्मा व इतर मान्यवर उपस्थित होते.**

## लोकलमधून पडून तरुणाचा मृत्यू

**मुंब्रा : प्रतिनिधी**

मुंबईच्या मध्य रेल्वेमार्गावर मुंब्रा पुलाजवळ मंगळवारी (दि.११) सकाळी सहाच्या सुमारास चालत्या लोकलमधून पडून २७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. साईराज बेणारे (वय २७, रा. उल्हासनगर) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार साईराज लोकलमधून पडून खाडीतील लोखंडी रॉडला अडकला होता. अग्निशमन दलाच्या जवानांनी रेस्क्यू वाहनाच्या मदतीने साईराजचा मृतदेह बाहेर काढला आणि पुढील कार्यवाहीसाठी मुंब्रा पोलिसांच्या ताब्यात दिला. मृतदेह कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून रेल्वे पोलीस या घटनेचा अधिक तपास करीत आहेत.

# आंबेनळी घाटमार्ग वाहतूक बंदी १६ ऑगस्टपर्यंत वाढवली

**रायगड : रामप्रहर वृत्त**

हवामान विभागाने पुढील काही दिवस अतिवृष्टीचा इशारा दिला असून आंबेनळी घाट परिसरातील भौगोलिक परिस्थिती आणि संभाव्य नैसर्गिक आपत्ती लक्षात घेता पोलादपूर–महाबळेश्वर (आंबेनळी घाट) राज्य महामार्ग १६ ऑगस्टपर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद असणार आहे. रायगड जिल्हा दंडाधिकारी किशन जावळे यांनी वाहतूक बंदी मुदतवाढीचे आदेश जारी केले आहेत.



पोलादपूर–महाबळेश्वर (आंबेनळी घाट) मार्ग सुरक्षिततेच्या दृष्टीने यापूर्वी ७ ते ३१ जुलै या कालावधीत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. त्यानंतर मार्गावरील परिस्थितीचा आढावा घेत सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतूक बंद ठेवण्याची मुदत वाढविण्याची विनंती पोलादपूर तहसीलदार यांनी केली होती.

आंबेनळी घाटातील भौगोलिक परिस्थिती, दरडी कोसळण्याची संभाव्यता तसेच अतिवृष्टीमुळे निर्माण होणारा धोका लक्षात घेता कोणत्याही क्षणी गंभीर अपघात अथवा जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून नवे आदेश जारी करण्यात आले आहेत.

# ‘हर घर तिरंगा’च्या जयघोषात पुणे दणाणले

## मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत देशभक्तीचा भव्य सोहळा

**पुणे : प्रतिनिधी**

विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी विकसित महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. ११) पुणे येथे ‘हर घर तिरंगा अभियान’ अंतर्गत तिरंगा रॅली मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार रवींद्र चव्हाण यांच्यासह इतर आमदार, महापौर आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



तिरंगा झेंडा हा देशभक्तीचे प्रतीक असून या तिरंग्याच्या सन्मानासाठी अनेकांनी बलिदान दिले आहे. “जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहे, जोपर्यंत महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवरायांचे मावळे आहेत, तोपर्यंत हा तिरंगा कोणीही खाली आणू शकणार नाही,” असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. “तिरंगा हाती घेतल्यानंतर केवळ आपले अधिकार नाही, तर आपली कर्तव्येही लक्षात ठेवावी लागतात. हा तिरंगा हात घेतल्यानंतर देशसेवेची जबाबदारी आपल्यावर आहे, याची जाणीव होते. ज्या संविधानाने आपल्याला अधिकार दिले, त्याच संविधानाने आपल्या खांद्यावर जबाबदाऱ्याही दिल्या आहेत. त्या पूर्ण करण्याचे काम आपल्याला करायचे आहे,” असेही मुख्यमंत्री म्हणाले.

पुणे ही विद्यानगरी, राज्याची उद्योगनगरी आणि भारताचे सांस्कृतिक बलस्थान आहे. राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्या भूमीवर सोन्याचा नांगर चालवला, ती ही पुण्यभूमी आहे. ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे’ हे इंग्रजांना ठणकावून सांगणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि क्रांतिकारकांची मांदियाळी तयार करणारे आद्यक्रांतिगुरू क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे, वासुदेव बळवंत फडके यांच्यासारख्या क्रांतिकारकांची ही भूमी आहे.

“या पुण्यभूमीतील तरुण नवीन भारताच्या निर्मितीसाठी आज हाती तिरंगा घेऊन पुढे आला आहे. या युवकांच्या सहकार्याने उद्याचा बलशाली भारत उभा राहील,” असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था झाला आहे आणि जगातील सर्वात मोठा शस्त्रास्त्र पुरवठा करणारा देश बनला आहे. “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिलेले विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी येत्या २० वर्षांत विकसित महाराष्ट्र उभा करायचा आहे. त्यासाठी समतेचा, प्रगतीचा, पुढे जाणारा आणि आपल्या युवकांच्या स्वप्नांना बळ देणारा विकसित महाराष्ट्र आपल्याला घडवायचा आहे,” असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी अधोरेखित केले.

# ‘राजवीर तरे’ निघाला ‘मिझानूर रहमान’!

## सोशल मीडियावर वेगळी ओळख सांगून प्रेमसंबंध, लग्नानंतर धर्मांतराचा दबाव आणि मुलाला घेऊन पती बेपत्ता झाल्याची नेरळ पोलिसांत पीडितेची तक्रार

**नेरळ : दर्वेश पालकर**

सोशल मीडियावर ‘राजवीर तरे’ या नावाने ओळख निर्माण करून आपल्याशी प्रेमसंबंध प्रस्थापित केले, मात्र लग्नाच्या वेळी त्याचे खरे नाव मिझानूर रहमान असल्याचे समोर आले. त्यानंतर धर्मांतरासाठी दबाव टाकण्यात आला आणि आपले धर्मांतर करून ‘झोया मिझानूर रहमान’ असे नाव ठेवण्यात आले तसेच मुलगा झाल्यानंतरही पती अन्य हिंदू मुलींच्या संपर्कात असल्याचा गंभीर आरोप एका पीडित महिलेने नेरळ पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत केला आहे.

पीडितेने पोलिस तक्रारीत म्हटल्याप्रमाणे, इन्स्टाग्रामवर ‘राजवीर तरे’ नावाच्या अकाउंटवरून तिला फ्रेंड रिक्वेस्ट आली होती. ती स्वीकारल्यानंतर दोघांमध्ये मैत्री वाढली आणि पुढे प्रेमसंबंध निर्माण झाले. संबंधित तरुणाने लग्नाची मागणी घातल्याने ती विवाहासाठी तयार झाली. लग्नाच्या प्रक्रियेदरम्यान संबंधित व्यक्तीचे नाव राजवीर तरे नसून तो मुस्लिम असून त्याचे नाव मिझानूर रहमान असल्याचे समोर आल्याचे पीडितेने तक्रारीत म्हटले आहे. यावेळी तिने लग्नास नकार दिला असता आपण कोणताही धर्म पाळत नसल्याचे सांगून त्याने तिची समजूत काढली आणि तिला तिच्या धर्माप्रमाणे राहण्यास सांगितल्याचा दावा तिने केला आहे.

पीडितेच्या तक्रारीनुसार लग्नानंतर काही महिन्यांनी तिच्यावर मुस्लिम धर्म स्वीकारण्यासाठी दबाव वाढला. मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागल्याने अखेर तिचे धर्मांतर करण्यात आले आणि ‘झोया मिझानूर रहमान’ असे नाव ठेवण्यात आले. त्यानंतर या दाम्पत्याला मुलगा झाला, मात्र त्यानंतर पती हा आणखी तीन ते चार हिंदू मुलींच्या संपर्कात असल्याचे मोबाईलमध्ये आढळून आल्याचा दावा पीडितेने पोलिस तक्रारीत केला आहे. संबंधित तरुण हिंदू मुलींना सोशल मीडियावर हिंदू नावाने ओळख सांगून प्रेमसंबंध निर्माण करतो, त्यानंतर लग्न करून धर्मांतरासाठी दबाव आणतो आणि पुढे त्यांना सोडून देतो, असा गंभीर आरोपही तिने केला आहे.

दरम्यान, हा प्रकार उघड करण्याची तयारी सुरू असतानाच मिझानूर हा आपल्या मुलाला घेऊन घरातून निघून गेल्याचे पीडितेने म्हटले आहे. त्याने स्वतःच्या आईलाही सोबत नेल्याचे तिचे म्हणणे आहे. त्यामुळे अखेर पीडितेने आपल्या आईचे घर गाठून नेरळ पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी नेरळ पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली असून संबंधित व्यक्तीचा शोध घेण्यासह प्रकरणाची चौकशी सुरू आहे. पीडितेने पोलीस तक्रारीत केलेले हे आरोप असून त्यांची सत्यता पोलीस तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

# रोह्यात समाधानकारक पाऊस

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात मंगळवारी सकाळपासूनच जोरदार पाऊस पडला. या पावसाने दिवसभर रोहा शहरासह ग्रामीण भागात हजेरी लावल्याचे दिसून आले. आधीच पावसाने उशिरा सुरुवात केली असल्यामुळे शेतकरी चिंतातूर होता, मात्र उशिरा सुरुवात झाल्यानंतर पावसाने सातत्य टिकवले आहे.

सध्या भातशेतीला हा पाऊस पूरक ठरत असल्याने बळीराजा सुखावला आहे. रोहा तालुक्यातील मेढा, नागोठणे, खांब, कोलाड, सुतारवाडी, धाटाव, भालगाव, घोसाळे, चणेरा, यशवंतखार, धामणसई, देवकान्हे या विभागांमध्ये चांगला पाऊस झाला आहे. भाताची लावणी जवळपास पूर्ण झाली असून या पावसाचा भातशेतीला मोठा फायदा होणार आहे.



# खालापूरमधील ८० टीबी रुग्णांना फूड बास्केटचे वाटप

**खालापूर : प्रतिनिधी**

पंतप्रधानांच्या 'टीबीमुक्त भारत अभियान' अंतर्गत क्षयरोगमुक्त जिल्हा व क्षयरोगमुक्त गावांची संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात येत असून या अभियानात कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी अंतर्गत आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया लिमिटेड, खालापूर यांनी 'निक्षय मित्र' म्हणून सहभाग नोंदवत खालापूर तालुक्यातील ८० क्षयरोग (टीबी) रुग्णांना फूड बास्केटचे वाटप केले.



टीबी रुग्णांना उपचारादरम्यान दीर्घकाळ नियमित औषधोपचारांसह सकस आहाराची आवश्यकता असते. अनेक रुग्ण आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याने त्यांना आवश्यक पोषण मिळण्यात अडचणी येतात. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा क्षयरोग कार्यालयामार्फत विविध संस्था, उद्योग व सामाजिक संघटनांना 'निक्षय मित्र' म्हणून पुढे येण्याचे आवाहन करण्यात येत आहे. त्यानुसार AMNS कंपनीने सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम हाती घेतला.या उपक्रमासाठी तत्कालीन जिल्हा क्षयरोग अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांना वेळोवेळी उपक्रमाची माहिती देत आवश्यक समन्वय साधला. तसेच जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मनीषा चव्हाण यांनी फूड बास्केटची गरज अधोरेखित करून संबंधित कंपनीला सहकार्याचे आवाहन केले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली वावोशी प्राथमिक आरोग्य केंद्रात फूड बास्केट वितरणाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास पंचायत समिती सदस्या प्रमिला पाटील, शिरवलीचे सरपंच महेश पाटील, AMNSचे प्रशासकीय अधिकारी किरण वायदे, प्रशासन विभाग प्रमुख किरण वैद्य, व्यवस्थापक सतीश भुसाळे, अमोल पारंगे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कल्याणी इंगोले, डॉ. मानसी कस्तुरे, डॉ. सीमा पाईकराव, जिल्हा पीपीएम समन्वयक सतीश दंतराव, महेंद्र पिंगळे, समाधान धनवे, लता अडसूळ तसेच आरोग्य विभागातील अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

# चोरट्याने फोडले पोलिसाचेच घर

## ■ वदपमध्ये ३.६८ लाखांचे सोन्याचे दागिने लंपास

**नेरळ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत असलेल्या परशुराम मराडे यांच्या कर्जत तालुक्यातील वदप येथील घराला अज्ञात चोरट्याने लक्ष्य करत तब्बल तीन लाख ६८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना ७ ऑगस्ट रोजी रात्री घडली.



मराडे हे सध्या ठाणे जिल्ह्यात वास्तव्यास असून अधूनमधून वदप येथील आपल्या गावी येत असतात. ७ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठच्या सुमारास परशुराम मराडे हे भावाच्या घरी गेले होते. घरातून बाहेर पडताना घराची चावी आतच विसरल्याने त्यांनी दरवाजाला बाहेरून कडी लावली. हीच संधी साधत अज्ञात चोरट्याने बंद घर हेरले आणि घरात प्रवेश केला. विशेष म्हणजे घरात प्रवेश केल्यानंतर चोरट्याने बेडरूममधील कपाटाची चावी शोधून कपाट उघडले.

त्यानंतर लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने चोरून नेले. चोरी केल्यानंतर कपाटाची चावी पुन्हा ज्या ठिकाणी ठेवली होती, त्याच ठिकाणी ठेवून चोरटा पसार झाला. या घटनेमुळे वदप परिसरात खळबळ उडाली असून बंद घर हेरून चोरट्याने केलेल्या या चोरीमुळे गावातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे चोरी झालेल्या घराचे मालकच महाराष्ट्र पोलीस दलात सेवेत असल्याने या घटनेने अधिकच चर्चा निर्माण झाली आहे. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अज्ञात चोरट्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला असून पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक मनीषा लटपटे करीत आहेत.

# गटारी अमावास्येला रोहा पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

## पाच बीटमध्ये पोलिसांची करडी नजर ; फार्महाऊससह शहरातही विशेष बंदोबस्त

**धाटाव : प्रतिनिधी**

गटारी अमावस्येच्या पार्श्वभूमीवर रोहा पोलीस प्रशासन सज्ज झाले असून तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस निरीक्षक अभय शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे.

गटारी अमावस्येच्या दिवशी तालुक्यात अनेक ठिकाणी मित्रपरिवाराकडून खाण्या–पिण्याच्या पार्ट्यांचे आयोजन केले जाते. तसेच अनेक फार्महाऊसवर मोठ्या प्रमाणात तरुणाईची गर्दी होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी रोहा पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन पोलीस अधिकारी आणि २४ हवालदार/पोलीस अंमलदारांचा बंदोबस्त तैनात राहणार आहे. तसेच तालुक्यातील पाच बीटमध्ये बीट अंमलदार सतर्क राहणार असून, आपल्या हद्दीत सातत्याने गस्त घालून परिस्थितीवर लक्ष ठेवणार आहेत.



रोहा तालुक्यात अनेक ठिकाणी फार्महाऊस आहेत. गटारी अमावस्येच्या निमित्ताने काही ठिकाणी खासगी पार्ट्यांचे आयोजन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे फार्महाऊस, रिसॉर्ट तसेच पार्टी आयोजित होणाऱ्या ठिकाणांवर पोलिसांची विशेष नजर राहणार आहे. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणे, ध्वनिक्षेपकाचा गैरवापर करणे किंवा इतर नागरिकांना त्रास होईल असे प्रकार घडल्यास पोलिसांकडून नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

रोहा शहरातील प्रमुख चौक, गर्दीची ठिकाणे आणि महत्त्वाच्या मार्गांवरही पोलिसांचा विशेष बंदोबस्त राहणार आहे. गटारीच्या दिवशी कोणत्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्था बिघडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येणार आहे. अनधिकृत धंद्यांनाही आळा घालण्यासाठी पोलिसांकडून विशेष कारवाई केली जाणार आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोरपणे नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

गटारी अमावस्येला मित्रपरिवारासोबत पार्ट्या, जेवण आणि मनोरंजनाचे आयोजन मोठ्या प्रमाणात केले जाते. मात्र आनंद साजरा करताना सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी तरुणांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, पोहण्याच्या ठिकाणी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, सार्वजनिक शांतता भंग होईल असे कृत्य करू नये आणि कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे. पोलीस निरीक्षक अभय शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा पोलिसांनी केलेल्या या नियोजनामुळे गटारी अमावस्येच्या दिवशी तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज राहणार आहे.

# ‘स्वरतिरंगा’मधून पनवेलमध्ये घुमणार देशभक्तीचा सुरेल जल्लोष

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

‘वंदे मातरम’च्या १५० वर्षांच्या स्मरणानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या वतीने देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ‘स्वरतिरंगा तरुण स्वरांतून राष्ट्रभक्तीचा बुलंद जयघोष!’ या संकल्पनेवर आधारित हा विशेष कार्यक्रम बुधवारी (दि. १२) दुपारी ३ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे होणार आहे.

देशभक्तीपर गीतांच्या माध्यमातून स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित करण्यासाठी विनामूल्य असणाऱ्या या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयोजित ‘देवकी मीडिया’ प्रस्तुत ‘स्वरतिरंगा’ कार्यक्रमात युवा गायक–गायिकांकडून देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. झी हिंदी सारेगमप फेम मिथिला माळी, उत्कर्ष चंदनशिवे, समृद्धी जाधव, निर्जला वाल्मिकी आणि अमोल चव्हाण हे युवा गायक–गायिका आपल्या सुरांनी रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेलिब्रिटी अँकर विनीत देव करणार आहेत.‘वंदे मातरम’च्या १५० वर्षांच्या स्मरणानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून नव्या पिढीमध्ये राष्ट्रभक्तीची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यामुळे स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर पनवेलकरांना एक वेगळा आणि उत्साहपूर्ण सांगीतिक अनुभव मिळणार आहे. कार्यक्रमासाठी अत्याधुनिक ध्वनी व प्रकाशयोजना करण्यात येणार असून लाईव्ह म्युझिक व नृत्याची साथ लाभणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नितीन पाटील राहणार आहेत. प्रमुख उपस्थितीमध्ये आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता प्रितम म्हात्रे, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांच्यासह महापालिकेचे सर्व नगरसेवक, नगरसेविका आणि अधिकारी उपस्थित राहणार आहेत.‘स्वरतिरंगा’च्या माध्यमातून तरुण स्वरांमधून राष्ट्रभक्तीचा बुलंद जयघोष अनुभवण्याची संधी पनवेलकरांना मिळणार असून कार्यक्रमासाठी कोणतेही प्रवेश शुल्क ठेवण्यात आलेले नाही.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्तीचा उत्साह आणि सांगीतिक आनंद यांचा सुरेल संगम साधणाऱ्या या कार्यक्रमात पनवेलकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका मुख्यालयाचे उपायुक्त कैलास गावडे यांनी केले आहे.

# सिडकोची आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी नवीन गृहनिर्माण योजना

## ■ ४,७७९ सदनिका उपलब्ध

## ■ १५ ऑगस्टपासून ऑनलाइन नोंदणी

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळातर्फे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) ४,७७९ सदनिकांची नवीन गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात येत असून शुक्रवार १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता www.cidcohomes.com या पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी सुरू होईल. या योजनेंतर्गत तळोजा सेक्टर ३९ येथे ४,२२९, कळंबोली बस डेपो येथे २५७ आणि खारघर बस डेपो येथे २९३ सदनिका उपलब्ध आहेत. योजनेतील काही सदनिका दिव्यांग अर्जदारांसाठी राखीव आहेत.



प्रत्येक प्रकल्पाची सदनिकानिहाय किंमत व सर्व इतर शुल्क नोंदणी सुरू होण्यापूर्वी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येईल. वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹६ लाखांपर्यंत असलेले व भारतात कुठेही पक्के घर नसलेले अर्जदार या योजनेसाठी पात्र आहेत ; सविस्तर पात्रता निकष व अटी पोर्टलवर उपलब्ध आहेत.

तळोजा, कळंबोली व खारघर हे नोड्स विस्तृत रस्ते जाळे, रेल्वे–मेट्रो सुविधा व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या समीपतेमुळे उत्तम दळणवळणाने जोडलेले आहेत.

सदनिकांचे वाटप हे पात्रता पडताळणी, कागदपत्रांची छाननी व योजनेच्या अटी–शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन राहील. अद्ययावत माहितीसाठी अर्जदारांनी www.cidcohomes.com या संकेतस्थळास भेट द्यावी.

# कार्मेल कॉन्व्हेंटमध्ये पोलिसांकडून विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे

**खोपोली : प्रतिनिधी**

डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि त्यातून निर्माण होणारे सायबर धोके लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा, डिजिटल जबाबदारी आणि सुरक्षित इंटरनेट वापराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्मेल कॉन्व्हेंट शाळेत ३ ते ७ ऑगस्ट या कालावधीत पाच दिवसीय सायबर जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या पुढाकारातून, खालापूर तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल आणि खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शंकर धुमाळ यांनी विद्यार्थ्यांना ‘डिजिटल तंत्रज्ञानाचा सुरक्षित आणि जबाबदारीपूर्ण वापर’ या विषयावर प्रबोधन केले.



या उपक्रमाच्या आयोजनासाठी कार्मेल कॉन्व्हेंटच्या स्थानिक व्यवस्थापक सिस्टर ज्युली मारिया, मुख्याध्यापिका सिस्टर निर्मल मारिया, उपमुख्याध्यापिका सिस्टर सरूपिया तसेच दर्शना टीचर, दिनू टीचर आणि दिपाली टीचर यांनी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांचे नियोजन आणि आयोजन करत सक्रिय सहभाग नोंदविला. सायबर गुन्ह्यांचे बदलते स्वरूप, सोशल मीडिया आणि मोबाईल ॲप्लिकेशनचा सुरक्षित वापर, ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव, डिजिटल गोपनीयता, पासवर्ड सुरक्षा तसेच वाढता स्क्रीन टाइम याबत विद्यार्थ्यांना विविध माध्यमांतून माहिती देण्यात आली. डिजिटल जगतातील धोके केवळ तांत्रिक नसून त्यांचा परिणाम वैयक्तिक सुरक्षितता, मानसिक स्वास्थ्य आणि सामाजिक जीवनावरही होऊ शकतो, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

नववीतील ३० विद्यार्थ्यांच्या समितीने पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा विषयावरील कृतीयुक्त गाणी, व्यंगचित्र यांसारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

# पनवेल मनपा महिला व बालकल्याण समितीची बैठक

## महिला उद्योजिकांसाठी मोदक व पुरणपोळी महोत्सव; १८ ऑगस्टला श्रावण महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, योजनांमध्ये आवश्यक सुधारणा तसेच नवीन योजनांचे प्रस्ताव याबाबत सोमवारी (दि. १०) मुख्यालयात बैठक घेण्यात आली. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या बैठकीत महिला व बालकांच्या शैक्षणिक, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक कल्याणाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



यावेळी महिला बालकल्याण समितीच्या सर्व सदस्या, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त मंगला माळवे, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, महिला व बालकांच्या कल्याण विभागप्रमुख कविता मोकल, डेएनयुएलएम व्यवस्थापक विनया म्हात्रे उपस्थित होत्या. या बैठकीत महिला आरोग्य व मातृ-शिशु आरोग्य संवर्धन योजना, हिरकणी कक्ष उभारणी तसेच कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी आर्थिक सहाय्याची वार्षिक रक्कम वाढविण्याबाबत चर्चा करण्यात आली. मातृ-शिशु आरोग्य योजनेंतर्गत गरजेनुसार मातांना व नवजात बालकांना सर्वसमावेशक व विनामूल्य आरोग्य सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबतही विचारविनिमय करण्यात आला. तसेच अनाथ बाल शिक्षण शिष्यवृत्ती योजना, अनाथ बाल शिक्षण प्रवेश सहाय्य योजना, एकल स्त्री पाल्य शिक्षण शिष्यवृत्ती योजना, एकल स्त्री पाल्य शिक्षण प्रवेश सहाय्य योजना आणि एकल स्त्री स्वावलंबन सन्मान योजना यांचा आढावा घेण्यात आला.

या योजनांचा अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महिला बचत गट व महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देण्यासाठी 'मोदक व पुरणपोळी महोत्सव २०२६' आयोजित करण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच श्रावण महिन्यानिमित्त 'श्रावण महोत्सव २०२६' हा सांस्कृतिक कार्यक्रम १८ ऑगस्ट रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ पात्र महिला, बालके आणि गरजू कुटुंबांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विभागीय पातळीवर आवश्यक कार्यवाही करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी बैठकीत मार्गदर्शन केले.

# इन्स्टाग्रामवरील ओळख अखेर ठरली घातक!

## ३.७२ लाखांची फसवणूक अन् गर्भपात

**पनवेल : वार्ताहर**

इन्स्टाग्रामवरून ओळख वाढवून तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढत तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार पनवेलमध्ये उघडकीस आला आहे. पीडिता गरोदर राहिल्यानंतर तिचा जबरदस्तीने गर्भपात घडवून आणत तीन लाख ७२ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करीत आरोपीने लग्न करण्यास नकार दिला.

आरोपी नीरज जांबेकर याने मार्च २०२२मध्ये पीडित तरुणीशी सोशल मीडियावर मैत्री केली. पुढे लग्नाचे आमिष दाखवून विविध ठिकाणी तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. तरुणी गरोदर राहिल्यानंतर आरोपीने तिला पेण येथील रुग्णालयात नेऊन इच्छेविरुद्ध गर्भपात घडवून आणला. याशिवाय शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली पीडितेकडून तीन लाख ७२ हजार ६३९ रुपये उकळले आणि नंतर तिच्याशी लग्न करण्यास स्पष्ट नकार दिला.

दरम्यान, यानंतर आपली फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात आल्यानंतर पीडित तरुणीने खांदेश्वर पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी नीरजविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवला असून पुढील तपासासाठी सदरचा गुन्हा नागोठणे पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

### पनवेल परिसरातून दुचाकीची चोरी

**पनवेल** : शिवाजीनगर झोपडपट्टी, दत्त हॉटेलजवळ पार्क करून ठेवलेली सुमारे ३० हजार रुपये किमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोष प्रमोद चिडालीया (२४) यांनी याबाबत तक्रार दिली आहे. त्यांची यामाहा कंपनीची दुचाकी चोरीला गेली. दुचाकीचा रंग पांढरा असून तिचा क्रमांक एमएच-४६ सीक्यू-२४८१ आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ करीत आहेत.

# कर्नाळा खिंडीत अपघातात मंकी जाळी आली रस्त्यावर

**पनवेल : वार्ताहर**

कर्नाळा खिंडीत एका अवजड वाहनाने मंकी जाळीला धडक दिल्याने दोन्ही बाजूंचे लोखंडी पोल वाकून जाळी रस्त्यावर आली. या घटनेमुळे दोन्ही दिशांची वाहतूक विस्कळीत होऊन मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. घटनेनंतर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. घटनेची माहिती मिळताच पनवेल तालुका पोलिसांचे पथक तसेच पळस्पे वाहतूक शाखेचे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले.



पोलिसांनी तत्काळ मदतकार्य सुरू करून रस्त्यावर आलेली मंकी जाळी बाजूला करण्याचे काम हाती घेतले. त्यानंतर वाहतूक टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली. पोलिसांच्या तत्परतेमुळे वाहतूक सुरळीत करण्यात यश आले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त एनसीएमसी कार्ड शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील सर्वाधिक मतदारसंख्या असलेल्या पनवेल विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले आहे. वाढदिवसानिमित्त भेटवस्तू किंवा अनावश्यक खर्च न करता समाजासाठी उपयुक्त उपक्रम राबविण्याचा संकल्प कार्यकर्त्यांनी केला असून खारघर शहरातही विविध ठिकाणी अनेक लोकोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमांतर्गत खारघर सेक्टर १२ येथील दुर्गामाता मंदिर, शिवाजी चौक येथे एनसीएमसी कार्ड नोंदणी व वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा तब्बल ३०७ नागरिकांनी लाभ घेतला.



शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एनसीएमसी कार्डच्या माध्यमातून मिळणाऱ्या सुविधांची माहिती घेऊन अनेक लाभार्थींनी समाधान व्यक्त केले. तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्य लाभावे, अशा सदिच्छाही व्यक्त केल्या.

या उपक्रमाचे आयोजन मंडळ सरचिटणीस दीपक शिंदे, महिला मोर्चाच्या अध्यक्ष साधना पवार आणि प्रभाग क्रमांक ५चे अध्यक्ष अजय माळी यांच्या पुढाकाराने करण्यात आले. खारघर शहरात एकूण तीन ठिकाणी एनसीएमसी कार्ड शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यातील पहिले शिबिर सेक्टर १२ येथे यशस्वीपणे पार पडले. आगामी काळात १४ ऑगस्ट रोजी सेक्टर ३ आणि १५ ऑगस्ट रोजी सेक्टर ११ येथील शनी मंदिर परिसरात एनसीएमसी कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खारघर शहरात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे यांच्या पुढाकाराने सेक्टर ३ येथे आयुष्मान भारत कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले. तसेच उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष संतोष शर्मा यांच्या वतीने एनसीएमसी कार्ड शिबिर, तर मंडळ अध्यक्ष नगरसेवक प्रवीण पाटील यांच्या वतीने कामगारांसाठी विमा कार्ड वितरणाचा उपक्रम राबविण्यात आला.

सेक्टर १२ येथील एनसीएमसी कार्ड शिबिराला भाजपच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भेट देऊन आयोजकांना प्रोत्साहन व सहकार्य केले. सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष उपयोगी ठरणारे उपक्रम राबविल्याबद्दल नागरिकांनी आयोजकांचे कौतुक केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सोशल मीडिया अध्यक्ष आनंद झाने, मंडल उपाध्यक्षा सीमा खडकर, महिला मोर्चा उपाध्यक्षा अश्विनी भुवड, वैशाली देसाई, विद्या येवले, संतोष शर्मा, सचिव स्नेहल बोढई, अमित बोढई, रजनी शर्मा, बिंदू सुरीला, नगरसेवक शत्रुघ्न काकडे, जगन्नाथ भानत आणि संदीप माघाडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यकर्त्यांचे एकत्रित प्रयत्न, नागरिकांचे सहकार्य आणि समाजोपयोगी उपक्रमांची भावना यामुळेच असे कार्यक्रम यशस्वी होतात.

भविष्यातही नागरिकांच्या हितासाठी अशाच प्रकारचे उपक्रम राबविण्यासाठी सर्वांचे सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा आहे. सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार, असे आयोजक भाजप खारघरचे सरचिटणीस शिंदे यांच्या वतीने सांगण्यात आले.

## निवडक

### ज्येष्ठ व्यक्ती बेपत्ता

**पनवेल** : पनवेल तालुक्यातील पळस्पे येथून ६३ वर्षीय हरिश्चंद्र गजानन पाटील बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात बेपत्ता व्यक्तीची नोंद करण्यात आली आहे. हरिश्चंद्र पाटील पळस्पे येथील विघ्नहर्ता अपार्टमेंटमध्ये राहतात. ते पळस्पे येथील गोल्डन बेल हॉटेल येथे जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडले, मात्र त्यानंतर ते अद्याप घरी परतले नसल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला. शोध घेऊनही ते मिळून न आल्याने पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. त्यांची उंची सुमारे ५.५ फूट, रंग निमगोरा, नाक सरळ व चेहरा गोल आहे. त्यांना कपाळावर जखमेची खूण असून ते चष्मा वापरतात. या प्रकरणाचा तपास पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक मिनाक्षी माळी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.



### अनोळखी इसमाचा मृत्यू

**पनवेल** : पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत लाईफ लाईन हॉस्पिटलसमोरील पुलाखाली एका अनोळखी बेवारस इसमाचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. लाईफ लाईन हॉस्पिटलसमोरील पुलाखाली ३५ ते ४० वर्षांचा इसम बेशुद्धावस्थेत आढळला. त्याला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले. मयताची ओळख अद्याप पटली नाही. वय ३५ ते ४० वर्षे असून रंग गहूवर्णीय, चेहरा गोल, उंची ५ फूट २ इंच आणि बांधा सडपातळ आहे. गुलाबी रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व काळ्या रंगाची पॅण्ट परिधान केली होती.

### मयुर भुजबळ एसीपीपदी

**पनवेल** : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ३च्या सहाय्यक पोलीस आयुक्तपदी मयुर भुजबळ यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. यापूर्वीचे परिमंडळ ३चे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांची बदली नवी मुंबई गुन्हे शाखा येथे करण्यात आली असून त्यांच्या जागी नवी मुंबई येथून मयुर भुजबळ यांची सहाय्यक पोलीस आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. यावेळी परिमंडळ ३ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक व इतर अधिकारीवर्गाने त्यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.



# पनवेलमध्ये गांजा बाळगणाऱ्या तरुणाला पोलिसांकडून अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अमली पदार्थविरोधी कारवाई करीत पोलिसांनी एका २१ वर्षीय तरुणाला गांजा बाळगल्याप्रकरणी अटक केली. ही कारवाई नवनाथ नगर झोपडपट्टी परिसरात पनवेल रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला करण्यात आली.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी आदित्य जगदीश मिश्रा (२१, रा. संतोष पाटील यांची चाळ, कोपरोली, पनवेल) याच्याविरुद्ध अमली पदार्थविरोधी कायदा १९८५ मधील कलम ८(क), २७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीकडे हिरवट मळकट रंगाचा, पाने-फुले असलेला गांजा आढळून आला. त्याने हा गांजा हाताच्या अंगठ्याच्या सहाय्याने मळून मळलेला पाला मातीच्या चिलीममध्ये भरून जळत्या काडीने पेटवून धूर तोंडावाटे ओढून सेवन करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

आरोपीला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम ३५(३) प्रमाणे नोटीस बजावण्यात आल्याचे नमूद आहे. या प्रकरणाचा प्राथमिक तपास सपोनि. अभिजीत पाटील करीत असून गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी पोउपनि. संजय अस्पतराव यांनीही कारवाईत सहभाग घेतला. दरम्यान, या धडक कारवाईमुळे अमली पदार्थविरोधी कारवाईला नवे बळ मिळाले आहे.

# गव्हाणच्या प्राथमिक आरोग्य केंद्राला नवी दिशा





**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

वातावरण, भौगोलिक बदल, लोकसंख्या आणि भविष्यातील आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन प्राथमिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि लोकाभिमुख करण्याच्या दिशेने रायगड जिल्हा परिषद सदस्य तथा गव्हाण जन आरोग्य समितीच्या अध्यक्षा निकिता निलेश खारकर यांच्या अध्यक्षतेखाली गव्हाण प्राथमिक आरोग्य केंद्रात जनआरोग्य समितीची पहिली सभा प्रभावीपणे पार पडली.

गणेश पूजन, दीपप्रज्वलन, स्वागत व प्रास्ताविकानंतर राष्ट्रगीत, राज्यगीत व वंदे मातरम् यांनी सभेची सुरुवात झाली. महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य समितीच्या आदेश व मार्गदर्शक सूचनांचे वाचन करण्यात आले. समितीच्या अध्यक्षा, सदस्य, वैद्यकीय अधिकारी व उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आल्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वार्षिक कामकाजाचा आणि आरोग्य सेवांचा आढावा घेण्यात आला.

प्रशासकीय कालावधीनंतर प्रथमच झालेल्या या सभेत गव्हाण प्राथमिक आरोग्य केंद्राचे तात्पुरते स्थलांतर, नवीन इमारत व आरोग्य संकुल, वहाळ-बेलपाडा परिसरातील उपकेंद्रांची गरज, वैद्यकीय मनुष्यबळ, तज्ज्ञ डॉक्टर, विशेष ओपीडी, यंत्रसामुग्री, आपत्कालीन सुविधा, संसर्गजन्य व कीटकजन्य आजारांवरील प्रतिबंधात्मक उपाय आणि भविष्यातील अर्थसंकल्पाचे नियोजन या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

दरम्यान, सभेला जन आरोग्य समितीच्या अध्यक्षा निकिता खारकर, सहअध्यक्षा डॉ. अपर्णा पवार, पनवेल पंचायत समिती सभापती रंजना वासकर, आरोग्य समिती सदस्य नितेश म्हात्रे, सोनाली जितेकर, भक्ती पालकर, जिज्ञासा कोळी, निर्मला शिंदे, रुपेश गायकवाड यांच्यासह वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि समितीचे सदस्य उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात अमली पदार्थविरोधी जनजागृती अभियान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर येथे ८ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांसाठी अमली पदार्थविरोधी जनजागृती अभियान व शपथविधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम अँटी नार्कोटिक्स विभागाच्या वतीने राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विभागाच्या पथकाने प्रबोधनपर पथनाट्य सादर केले.



या प्रभावी सादरीकरणातून अमली पदार्थांच्या व्यसनाचे गंभीर परिणाम आणि त्यापासून दूर राहण्याचा संदेश बेलापूर येथील अमली पदार्थविरोधी गुन्हे शाखा विभागातील पोलीस निरीक्षक निगडे यांनी विद्यार्थ्यांना दिला. शेवटी विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांपासून दूर राहण्याची तसेच समाजात जनजागृतीची शपथ घेतली. विद्यार्थ्यांना निरोगी, सुरक्षित व व्यसनमुक्त जीवनाचा मार्ग स्वीकारण्यासाठी प्रेरणा देणारा उपक्रम प्रभावी ठरला. या उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांनी प्राचार्य निशा नायर यांचे आभार मानले.

# कळंबोलीत रिक्षाचालकाला हेल्मेटने जबर मारहाण

## दोघांविरोधात गुन्हा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिक्षा थांबवल्याचा राग मनात धरून स्कुटीवरील दोघांनी रिक्षाचालकाला दगडाने आणि हेल्मेटने मारहाण केल्याची घटना बालाजी कॉम्प्लेक्स समोरील रोड, कळंबोली येथे घडली. याप्रकरणी १० ऑगस्ट रोजी सुजान खान आणि कौशल खान (रा. तळोजा) यांच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

६ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास रिक्षाचालक ऋषिकेश दिनकर राठोड हे त्यांची रिक्षा मुंबई-पनवेल हायवेने बालाजी कॉम्प्लेक्ससमोरील रोड, कळंबोली येथे प्रवाशांना सोडण्यासाठी थांबले होते. यावेळी पाठीमागून पिकअप वाहन आणि त्याच्या मागील स्कुटी क्र. MH ०३ EV १४७३ने रिक्षाला ठोकर दिली. यावरून वाद झाला. यावेळी स्कुटीवरील सुजान खान आणि कौशल खान यांनी शिवीगाळ केली आणि दगडाने तसेच हेल्मेटने मारहाण करून रिक्षाचालकाला जखमी केले.

## संपादकीय

# गरज व्यवस्था बदलाची

भविष्यात पुन्हा कधीही जपतलाईच्या निवासी आश्रमशाळेसारखी दुर्दैवी घटना घडू नये यासाठी व्यवस्थेत बदल झाला पाहिजे. महाराष्ट्रातील प्रत्येक आदिवासी विद्यार्थ्याला सुरक्षित आश्रमशाळा मिळेल अशी हमी देणारी नवी व्यवस्था उभी राहिली पाहिजे.

**गडचिरोलीच्या धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील निवासी आश्रमशाळेत घडलेली सर्पदंशाची घटना राज्यभरातील कुणाही सुजाण व्यक्तीला सुन्न करणारी आहे. ९ ऑगस्टच्या मध्यरात्री या आश्रमशाळेच्या वसतिगृहात झोपलेल्या विद्यार्थिनींना विषारी सापाने दंश केला. सहा मुलींना सर्पदंश झाला आणि त्यापैकी तीन आदिवासी विद्यार्थिनींचा दुर्दैवी मृत्यू झाला. अन्य मुलींवर उपचार सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेविषयी तीव्र संताप व्यक्त केला असून त्यांनी या घटनेसंदर्भात अतिशय कठोर भूमिका घेतली आहे. संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्यात आली असून राज्यभरातील सर्व अनुदानित आदिवासी आश्रमशाळांचे त्रयस्थ संस्थेकडून ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुर्गम भागातील शाळांची पाहणी केवळ कागदोपत्री राहू नये अशी स्पष्ट भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली आहे. अनुदानित आश्रमशाळांसाठी प्रमाणित कार्यपद्धती अर्थात एसओपीही निश्चित केली जाणार आहे. संबंधित आश्रमशाळेत अनेक मुली जमिनीवर झोपल्या होत्या, वसतिगृहात वॉर्डन नव्हता आणि मूलभूत सुविधांचाही अभाव होता असे समजते. असे असताना, शाळेची नुकतीच पाहणी करून अनुकूल अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्यावरही कारवाईचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. ही अनुदानित आश्रमशाळा या भागातील काँग्रेसचे माजी खासदार मारोतराव कोवासे यांच्या संस्थेशी संलग्न असून त्यांचे पुत्र काँग्रेस जिल्हाध्यक्ष विश्वजीत कोवासे या संस्थेचे काम सध्या पाहतात. तीन अजाण मुलींच्या दुर्दैवी मृत्यूस या शाळेतील दुरावस्था कारणीभूत ठरली आहे. त्यामुळे या संस्थेची व्यवस्था नेमकी कशी चालत होती याची सखोल चौकशी झालीच पाहिजे. आदिवासी आणि दुर्गम भागातील मुलांना शिक्षणाची समान संधी मिळावी म्हणून सरकार अनुदान देते. त्या पैशातील प्रत्येक रुपया विद्यार्थ्यांच्या निवास, भोजन, आरोग्य, स्वच्छता, सुरक्षा आणि शिक्षणासाठी खर्च झाला का याचा हिशेब सरकारने मागितलाच पाहिजे. सध्या या दुर्दैवी घटनेवरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. तीन आदिवासी मुलींच्या मृत्यूचे राजकीय भांडवल करण्यापेक्षा दोषी कोण आहे हे शोधणे अधिक महत्त्वाचे आहे. मानवी हक्कांच्या दृष्टीनेही या घटनेकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. आदिवासी मुलांना सुरक्षित निवास, आरोग्य आणि शिक्षणाचा अधिकार आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडेही तक्रार दाखल झाली आहे. त्या प्रक्रियेतूनही सत्यच बाहेर यावे. आयोगाने अवश्य शाळेतील वस्तुस्थिती तपासावी. मुख्यमंत्री फडणवीस यांनी परवाना रद्द करण्यापलीकडे जाऊन राज्यभरातील संपूर्ण व्यवस्थेचे ऑडिट करण्याचा घेतलेला निर्णय म्हणूनच महत्त्वाचा आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही संदिग्धता किंवा मनमानी राहू नये यासाठी नव्या एसओपीमध्ये वसतिगृहांची सुरक्षितता, विद्यार्थ्यांची झोपण्याची व्यवस्था, रात्रीच्या वेळी कर्मचारी व वॉर्डनची उपस्थिती, स्वच्छता, सर्प व इतर धोकादायक प्राण्यांपासून संरक्षण, आपत्कालीन वैद्यकीय सुविधा, जवळच्या रुग्णालयाशी संपर्क आणि आपत्तीच्या प्रसंगी तातडीची कार्यवाही यांसाठी स्पष्ट निकष निश्चित झाले पाहिजेत. महत्त्वाचे म्हणजे ही एसओपी केवळ कागदावर राहू नये. त्याची नियमित तपासणी, जबाबदारी निश्चिती आणि उल्लंघन झाल्यास कठोर कारवाईची तरतूदही असली पाहिजे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी किमान मानके नव्हे, तर अनिवार्य मानके निश्चित करणारी ही कार्यपद्धती असली पाहिजे.**

# दीप अमावास्या : पूजन आणि महत्त्व



यंदा बुधवारी, १२ ऑगस्ट रोजी आषाढ अमावस्या आहे. तिलाच दीप अमावस्या किंवा दिव्यांची आवस असे म्हणतात. या दिवशी देव घरातील दिवे स्वच्छ उजळून सायंकाळी पाटावर मांडून, रांगोळी काढून यथासांग पूजा केली जाते. या पूजेला कणकेच्या दिव्यांचाही नैवेद्य दाखवला जातो. तसे करणे हे या परंपरेचा एक भाग आहे. परंतु अनेकांना प्रश्न पडतो, की हा दिवा दीप पूजेसाठी असतो की पितरांच्या पूजेसाठी? त्यामागील शास्त्र जाणून घेऊ...

दिव्यांचा प्रकाश मनातील आणि सभोवतालचा अंधकार (अज्ञान, दुःख) दूर करून सकारात्मक ऊर्जा आणतो असा विश्वास आहे. या दिवशी कणकेचा दिवा दक्षिण दिशेला पितरांच्या निमित्ताने ठेवण्याची व लहान जीवजंतूंसाठी आदर व्यक्त करण्याची पद्धत आहे. पवित्र अशा श्रावण महिन्याच्या आगमनापूर्वी येणारी ही अमावास्या घरात सुख, शांती आणि समृद्धी नांदो यासाठी प्रार्थना करण्यासाठी विशेष मानली जाते

अमावस्येच्या तिथीला पितरांचे स्मरण करून त्यांना नैवेद्य दाखवला जातो तसेच दानधर्म केला जातो. प्रत्येक अमावस्येचे वेगवेगळे वैशिष्ट्य आहे, त्याप्रमाणे आषाढ अमावस्येला दिव्यांच्या पूजनाचे महत्त्व आहे. ही पूजा म्हणजे येणाऱ्या श्रावणाच्या स्वागताची जणू तयारीच असते. अशा उत्सव प्रसंगी कणकेचा किंवा ज्वारीचा दिवा करून तो दक्षिण दिशेला लावला जातो. हा दिवा दीप पूजा आणि पितरांची पूजा असे दोन्ही हेतू साध्य करतो. दीप अमावास्येनिमित्त या दिव्याची पूजा करून तो दक्षिण दिशेला ठेवल्यामुळे या दिशेने यमसदनी जाणाऱ्या पितरांना प्रकाशाची वाट दर्शवली जाते तसेच किडा मुंगीच्या रूपाने दिव्यापाशी गोळा होणारे जीव ते कण खाऊन तृप्त होतात. हे अप्रत्यक्ष अन्नदानाचे स्वरूप आहे.

सायंकाळी सर्व दिवे उजळून (पेटवून) आरती करावी. आरतीपुरते घरातील विजेचे लहानमोठे सर्वच्या सर्व दिवे चालू ठेवावेत. बाहेर काळोख, पाऊस, थंड हवा आणि घरात उजळलेले सर्व प्रकारचे सर्व दिवे पाहून खूप प्रसन्न वाटते. या सर्व गोष्टी करतांना तुमची एखादी चूक झाल्यास फार काही बिघडत नाही. देवाला तुमची मनोभावे केलेली भक्ती हवी असते. तुमची चूक झाली तर तो तुम्हाला ठोकून काढीत नाही. त्यामुळे सण आनंदाने आणि श्रद्धेने साजरा करावा, दडपणाने, भीतीने करू नये तसेच सोबत दिलेली दिव्यांची नावे घ्यावीत!

हा दिवा गुळाच्या पाण्यात बनवल्याने इतका चविष्ट बनतो, की नैवेद्य म्हणून तो जेवताना पानात वाढला जातो. मनुष्याला सण वार एकवेळ लक्षात राहणार नाहीत, परंतु पोटातून गेलेला मार्ग तो सहसा विसरत नाही. कणकेचे दिवे या सणाची ओळख बनून प्रतिवर्षी आपल्याला या परंपरेची आठवण करून देतात.

सर्वसामान्य घरातले लोकही या पदार्थाचा आस्वाद घेऊ शकतात, एवढा तो बनवणे सोपे आणि बिनखर्चिक आहे. या दिव्यात साजूक तूप घालून खाल्ले असता त्याची चव आणखी छान लागते. हे दिवे आपल्याला एवढे आवडतात, तर ते खाऊन आपले पितर आणि अन्य सूक्ष्म जीव जिवाणू का बरे तृप्त होणार नाहीत? यासाठीच दीप अमावस्येला कणकेच्या दिव्यांचे प्रयोजन केले जाते.

पाव वाटी गूळ बुडेल एवढे पाणी घेऊन गूळ पूर्ण वितळवून घ्यावा. एक वाटी कणिक अर्थात गव्हाचे पीठ घेऊन त्यात चिमूटभर मीठ, दोन चमचे तूप कणकेत एकत्र करून गरज लागेल त्याप्रमाणे गुळाचे पाणी टप्प्याटप्प्याने घालून कणिक तिंबून घ्यावी. त्याचे पुऱ्यांसाठी करतो तेवढे गोळे करून त्यांना दिवा, पणतीचा आकार द्यावा. एका चाळणीला तेलाचा किंवा तुपाचा हात लावून त्यात दिवे ठेवावे. एका मोठ्या पातेल्यात पाणी घेऊन त्यावर अलगद राहील अशा बेताने चाळणी ठेवावी आणि वर ताट ठेवून पातेले झाकावे. हे दिवे इडली पात्रातही करता येतात. जवळपास २० मिनिटे दिवे शिजू द्यावेत, मग गॅस बंद करून दिवे थोडे गार झाल्यावर त्यात साजूक तूप घालून खावेत.

प्रत्येक पूजेमध्ये आपण देवासमोर निरांजन ओवाळून आरती करतो, परंतु दीप अमावस्या हा सण दिव्यांचा, म्हणून या दिवशी दिव्यांची आरती म्हणून पूजेची सांगता करावी.

(साभार इंटरनेट)

# प्रसिद्ध गणेश मूर्तीकार बी.आर.खेडकर



छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्यादेवी होळकर, महात्मा गांधीजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, अण्णाभाऊ साठे, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेक थोर व्यक्तींचे प्रमाणबद्ध पुतळे बनवून शिल्पकलेच्या क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटविणारे ज्येष्ठ शिल्पकार बी. आर. ऊर्फ अप्पासाहेब खेडकर यांचा आज जन्मदिन आहे.

नव्वद वर्षांच्या आयुष्यात अनेक शिल्पकृतींद्वारे त्यांनी आपल्या राज्याच्या कानाकोपऱ्यांत आपल्या खुणा ठेवल्या आहेत. तीन फुटांपासून साडेअठरा फूट उंचीच्या साडेचारशेहून अधिक ब्राँझ पुतळे साकारलेले खेडकर हे अव्वल दर्जाचे कलावंत होते.

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या आवारातील अठरा फुटी पुतळा त्यांच्याच कसबी हातातून साकारला आहे. प्रसिद्ध शिल्पकार विनायक पांडुरंग करमरकर यांनी घडविलेल्या शिवाजी महाराजांचा पुतळा पुण्यात आहे. त्यापासून अप्पासाहेबांना प्रेरणा घेतली. १२ ऑगस्ट १९२६ रोजी जन्मलेले खेडकर यांचे बालपण गरिबीत गेले, मात्र हातात कला होती. त्यांनी गणेशमूर्ती साकारण्यास सुरुवात केली. पुण्यात सोमवार पेठेत गणेशमूर्तीचा कारखाना सुरू केला. प्रमाणबद्धता, सुबकता, रेखीवपणा यांमुळे त्यांच्या मूर्ती भाविकांच्या आवडत.

पुण्यातील अनेक मंडळे गणेशमूर्ती खेडेकर यांच्याकडूनच करवून घेत. मूर्तिकामाबरोबर विविध सिनेमा कंपन्यांतील कला विभागातही ते काम करीत. या कामातून त्यांची आणि मुगल-ए-आझम चित्रपटाचे दिग्दर्शक के. आसिफ यांची भेट झाली. त्यांच्या शिल्पकलेचे कसब पाहून आसिफ यांनी 'मुगल ए आझम'च्या कला विभागाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली.

मुगल बादशहाचा काळ रूपेरी पडद्यावर साकारण्याला खेडकर यांची अशाप्रकारे मदत झाली आहे. याच चित्रपटात त्यांनी मधुबाला हिच्या चेहऱ्याचा रबरी मास्क हुबेहूब बनविला. एका नृत्य कलावंताने तो मास्क घालून 'प्यार किया तो डरना क्या' या गाण्यावर नृत्य केले आणि मधुबालाच्या नृत्याचा भास निर्माण केला. याच चित्रपटातील पृथ्वीराज कपूर, दिलीपकुमार, मधुबाला यांचे मोठे पुतळेही खेडकरांनी साकारले. १९६०नंतर त्यांनी चित्रपटक्षेत्राला रामराम करून शिल्पकलेला वाहून घेतले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बनविण्याची त्यांना प्रथम संधी मिळाली ती १९६१ साली. पहिला शाडूचा पुतळा पानशेतच्या पुरात वाहून गेला. त्यानंतर तो पुन्हा बनविला गेला आणि त्यानंतर ब्राँझचा पुतळा बनला. तो साताऱ्यात पोवई नाक्यावर आजही आहे. पुढे त्यांनी शिवाजी विद्यापीठातील पुतळा बनविला. तो उत्कृष्ट झाल्याने यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला गेला. त्यानंतर त्यांना अनेक मान-सन्मानांनी खेडकर गौरविले गेले. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# फसव्या कॉल्सना आळा घालण्यासाठी मोठा निर्णय

अनोळखी नंबरवरून येणारे कॉल्स आणि डिजिटल फसवणुकीपासून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा देण्यासाठी भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (TRAI) अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. १० ऑगस्ट २०२६ रोजी ट्रायने एका नवीन प्रणालीची सुरुवात केली आहे. या नवीन सुविधेमुळे ग्राहकांसाठी खरा कॉल आणि बोगस कॉल यांमधील फरक ओळखणे अत्यंत सोपे होणार आहे.




दररोज अनेकांना अनोळखी मोबाईल नंबरवरून विविध प्रकारचे कॉल येतात. गॅस, वीज, कुरिअर किंवा इतर सेवा कंपन्यांच्या नावाने केले जाणारे काही कॉल फसवणुकीचे माध्यम ठरतात. याल आळा घालण्यासाठी TRAIने नवीन व्यवस्था आणली आहे. या व्यवस्थेंतर्गत १६०१पासून सुरू होणारी विशेष नंबर सिरीज सेवा आणि व्यवहाराशी संबंधित व्हॉइस कॉल्ससाठी वापरली जाणार आहे. त्यामुळे ग्राहकांना एखादा कॉल अधिकृत संस्थेकडून आला आहे की फसवणूक करणाऱ्याकडून हे ओळखणे तुलनेने सोपे होण्याची अपेक्षा आहे.

सध्या अनेक फसवणूक करणारे सामान्य १० अंकी नंबरचा वापर करून मोठ्या कंपन्यांचे प्रतिनिधी असल्याचे भासवतात आणि ग्राहकांना जाळ्यात ओढतात. या प्रकाराला आळा घालण्यासाठी १६०१ नंबर सिरीजचा पहिला टप्पा लागू करण्यात आला आहे. या सिरीजमधील नंबर केवळ पात्र संस्थांना पडताळणीनंतर देण्यात येणार आहेत. दूरसंचार सेवा पुरवठादारांना प्रत्येक संस्थेची योग्य पडताळणी करणे बंधनकारक आहे तसेच १६०१ सिरीजमधून मिळालेला नंबर केवळ सेवा आणि व्यवहाराशी संबंधित व्हॉइस कॉल्ससाठीच वापरण्याचे संस्थेकडून हमीपत्र घेतले जाणार आहे.

या नवीन व्यवस्थेच्या पहिल्या टप्प्यात BFSI आणि सरकारी क्षेत्र वगळता इतर क्षेत्रांतील पात्र संस्थांचा समावेश करण्यात आला आहे. विशेषतः युटिलिटी आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील कंपन्यांसाठी याचा वापर महत्त्वाचा ठरणार आहे. यामध्ये प्रामुख्याने वीज वितरण कंपन्या, पाणीपुरवठा आणि जलसेवा संस्था, शहर गॅस वितरण कंपन्या, LPG वितरण संस्था, कुरिअर कंपन्या, एक्सप्रेस लॉजिस्टिक्स कंपन्या, पार्सल डिलिव्हरी सेवा पुरवठादार यांचा समावेश होतो.

दरम्यान, बँकिंग, वित्तीय सेवा, विमा आणि संबंधित नियामकांच्या अखत्यारितील वित्तीय संस्थांसाठी १६०० नंबर सिरीजची व्यवस्था कायम आहे.

# भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार डॉ. विक्रम साराभाई



## निमित्त

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून विक्रम साराभाई ओळखले जातात. विक्रम अंबालाल साराभाई यांचा जन्म अमदावाद येथील एका संपन्न कुटूंबात १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला.

विक्रम साराभाई यांचे वडील हे एक उद्योगपती होते. त्यांचे बऱ्याच राजकीय व्यक्तिंशी त्यांचे संबध असल्याने रवींद्रनाथ टागोर, जवाहरलाल नेहरू, सरोजिनी नायडू, महात्मा गांधी आदी लोकांचे त्यांच्या घरी जाणे-येणे होते. विक्रम साराभाई यांच्या आई सरलादेवी यांनी आपल्या आठ मुलांच्या शिक्षणासाठी स्वतःची मांटेसरी पद्धतीची शाळा काढली होती. या शाळेतच विक्रम साराभाईचे शिक्षण युरोपातून आलेल्या शिक्षकांद्वारे झाले. त्याना लहानपणापासूनच गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय विशेष आवडत होते.

आपले बारावीपर्यंतचे शिक्षण आटपून १९३७ साली पुढील शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रिज विद्यापीठात शिकायला गेले, पण दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने ते भारतात परत आले व त्यांनी बंगलोरमधील इंडियन इन्स्टियूट ऑफ सायन्समध्ये नोबेल पारितोषिक विजेते सर सी. व्ही. रामन यांच्या मार्गदर्शनाखाली वैश्विक किरणावर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी भरतनाट्यम, कुचिपुडी या नृत्यकलेत पारंगत असलेल्या प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिकेय आणि मल्लिका ही दोन अपत्ये झाली.


१९४५ साली दुसरे महायुद्ध संपल्यावर विक्रम साराभाई ब्रिटनला गेले. १९४७ साली त्यानी 'कास्मिक रे इन्वेस्टिगेशन इन ट्रापिकल लैटीट्यूड्स'वर संशोधन करून डॉक्टरेट मिळवली आणि त्याचवर्षी ते आपल्या मायदेशी परत आले. भारतात परत येऊन त्यांनी ११ नोव्हेंबर १९४७ला अहमदाबाद येथे फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीची स्थापना केली. हे त्यांचे पहिले पाउल होते, पुढे जाऊन अवकाश संशोधनात विक्रम साराभाई यांनी भरीव कामगिरी केली.

विक्रम साराभाई यांनी अहमदाबाद येथील भारतीय प्रबंध संस्था (इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट) स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. १९७५मध्ये जो पहिला अंतरिक्ष उपग्रह आर्यभट्ट अवकाशात सोडला गेला त्याची रचना विक्रम साराभाई यांच्या अहमदाबाद रिसर्च सेंटर मध्येच केली होती. आर्यभट्टच्या यशस्वी प्रक्षेपणानंतर भारताने अनेक उपग्रह अवकाशात प्रक्षेपित केले. या यशामागे साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व यांचा मोलाचा वाटा आहे.

डॉ. विक्रम साराभाई यांना सन १९६६ साली पद्मभूषण आणि १९७२ साली मरणोत्तर पद्मविभूषण हे पुरस्कार भारत सरकारतर्फे देण्यात आले. ३१ डिसेंबर १९७१ रोजी केरळ राज्यातील कोवालम येथे रात्री झोपेतच हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. तिरुअनंतपुरम येथील थुंबा इक्वेटोरियल रॉकेट लॉन्चिंग स्टेशन आणि संबंधित अवकाश संस्थांचे नामकरण महान शास्त्रज्ञाच्या सन्मानार्थ विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे करण्यात आले.

(साभार विकासपीडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# फिट राहायचेय तर 'या' पदार्थांचा वापर करा!

आजकल बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांचे वजन वाढत आहे. त्यामुळे फिगर चांगली व्हावी म्हणून अनेकजण फिटनेस सेंटरमध्ये घाम गाळत आहेत, परंतु कार्यालयातील बैठे काम आणि फास्टफूडचा वापर यामुळे वजनवाढ आणि बेढब शरीर ही आजकाल सर्वसामान्य समस्या झाली आहे.



लठ्ठपणा ही जगभरातील समस्या बनली असून त्यामुळे अनेक आजार शरीरात घर करुन राहीले आहेत. काही वनस्पती देखील वजन कमी करण्यास मदत करीत असतात. त्या कोणत्या ते पाहूयात..

जगभरातील लठ्ठपणामुळे जागतिक आरोग्य संघटनेने चिंता व्यक्त केली आहे. अनेकांना बदलत्या जीवनशैलीमुळे व्यायामासाठी वेळ काढता येणे अशक्य झाले आहे. त्यांच्यासाठी या सहा वनस्पती कामी येणाऱ्या आहेत.

**त्रिफळा** -त्रिफळा हे नावावरुनच तीन फळांचे मिश्रण असते. यात आमलकी, बिभीतकी आणि हरितकी या फळाचे मिश्रण असते. त्रिफळा आरोग्यासाठी खूपच गुणकारी आहे. याला पचन समस्येसाठी वापरले जाते. यामुळे पचनआणि एलिमिनेशन यात सुधारणा होऊन वजन घटविण्यास मदत मिळते.

**बडीशेप** -बडीशेप आपण जेवणानंतर माऊथफ्रेशनर म्हणून वापरत असतो. बडीशेफ ही वजन घटविण्यासाठी देखील फायदेशीर आहे. यात विरघळणारे फायबर आढळते. त्यामुळे आपल्याला बराच काळ पोट भरल्यासारखे वाटते. यामुळे भूक कमी होते. आणि पचन यंत्रणेत सुधारणार होते. त्यामुळे बडीशेफ खाण्याने वजन कमी होण्यास मदत मिळते.

**दालचिनी** -दालचिनी ही मसाल्यात वापरली जाते. प्रत्येक भारतीय घरात दालचिनी असते. यात थर्मोजेनिक गुणधर्म असतात. जे मेटाबॉलीजम वाढवितात, तसेच चरबी जाळण्यास मदत करतात.

**हळद** -हळदीत अनेक औषधी गुणधर्म आहे. अनेक भारतीय पदार्थांत हळद वापरली जाते. यातील एक्टीव्ह करक्यूमिनमध्ये ॲण्टी इफ्लेमेटरी गुण आढळतात. जे चरबी जमा होण्यास रोखतात.

**मेथीदाणे** -मेथीदाणेदेखील वजन कमी करण्यासाठी वापरतात. यातदेखील मोठ्या प्रमाणावर फायबर असते.त्यामुळे ते आपल्याला खूप काळ भूक लागू देत नाहीत. तसेच मेथीदाण्यांचा डाएटमध्ये समावेश केल्याने ब्लड शुगर लेव्हल देखील कंट्रोलमध्ये राहाते.

# कृष्णा पारंगे दूरदृष्टी असलेले सभापती

## भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांचे गौरवोद्गार





**चौक : प्रतिनिधी**

समाजसेवेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडलेला माणूस खालापूर तालुक्याला सभापती मिळणे हे सर्वांचेच भाग्य आहे, असे प्रतिपादन उत्तर रायगड भाजप अध्यक्ष अविनाश कोळी यांनी केले.

खालापूर तालुका पंचायत समिती सभापती कृष्णा गंगाराम पारंगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भव्य मेडिकल कॅम्प आयोजित करण्यात आला होता, त्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे यांनी वासंबे ग्रामपंचायत सरपंच भारतीय जनता पार्टीचा असावा अशी इच्छा व्यक्त केली. उपसभापती भाई शिंदे यांनी सभापती कृष्णा पारंगे यांच्या कार्याचा आणि समय सूचकता याविषयी गौरव उद्गार काढले. यावेळी उपसभापती भाई शिंदे, माजी सभापती नरेश पाटील, माजी सभापती कांचन पारांगे,भाजप उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, जिल्हा परिषदेच्या सदस्या नेहा पारंगे, मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, पंचायत समिती सदस्य अर्चना भोईर, प्रमिला पाटील, देवयानी देशमुख,जेष्ठ नेते कैलास म्हात्रे, संदीप पाटील, माजी सरपंच भूषण पारंगे, वृषाली म्हात्रे, सद्गुण पाटील, ताई पवार, नम्रता भोईर, शिवसेना तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे, मनसे अध्यक्ष नानू सावंत, माजी उपसभापती विश्वनाथ पाटील यांच्यासह विविध पक्षांतील कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

यावेळी भव्य आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. यात कर्करोग तपासणी, वंध्यत्व निवारण, अस्थिरोग निवारण, सोनोग्राफी, युरिक ॲसिड तपासणी, रक्त तपासणी, डोळे तपासणी करून मोफत चष्मे वाटप, ज्यांना नेत्र तपासणी करून शस्त्रक्रिया करावी लागते त्यांची नाव नोंदणी करण्यात आली. मधुमेह तपासणी, वीर्य तपासणी यांच्या मोफत तपासण्या यावेळी करण्यात आल्या.

# वेध गणेशोत्सवाचे! मूर्तिकार रंगकामात मग्न

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरातील शिंदे चित्र शिल्पालयात साकारल्या जाणाऱ्या गणेश मूर्तींना यंदा दूरदूरवरून मोठी मागणी होत आहे. मागील वर्षांच्या तुलनेत यावर्षी मागणीत लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र शाडूची माती, प्लास्टर ऑफ पॅरिस आणि रंगांच्या किंमती सुमारे ३०% ने वाढल्याने गणेश मूर्तींच्या किंमतीतही वाढ झाल्याचे दिसून येत आहे.



शिल्पकारांनी मे महिन्यापासूनच तळा तालुक्यात मूर्ती तयार करण्यास सुरुवात केली आहे. आजपर्यंत या शिल्पालयात अंदाजे ६०० गणेश मूर्ती घडविण्यात आल्या आहेत. सध्या रंगकामाला सुरुवात झाली असून या मूर्ती तालुक्यासह माणगाव, रोहा, मुरूड, म्हसळा आदी ठिकाणी पाठविण्यात येणार आहेत. तालुक्यातील शिंदे चित्र शिल्पालयाचे संचालक सतीश हरिश्चंद्र शिंदे यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले, "आमच्या शिंदे चित्र शिल्पालय कारखान्याची सुरुवात २००० मध्ये केली. सुरुवात करण्यापूर्वी मी इतर ठिकाणी रंगकाम आणि मूर्ती स्वतः हाताने घडवत होतो. नंतर स्वतःचे स्वतंत्र शिल्पालय असावे, यासाठी सर्वांनी मार्गदर्शन केले आणि काम सुरू केले.

सुरुवातीला काही ठराविक मूर्ती तयार केल्या. गणेशभक्तांना मूर्ती आवडल्या आणि मागणीत वाढ झाली. आजच्या स्थितीत ६०० मूर्तींची मागणी आहे. यावर्षी रंग, शाडूची माती व इतर साहित्याच्या किंमती वाढल्याने गणेशमूर्तींच्या किंमतीतही वाढ झाली आहे. जूनपासून मूर्ती तयार करण्यास सुरुवात झाली आहे. त्यातच गणेशभक्त सांगतील त्याप्रकारची मूर्ती तयार करून द्यावी लागते. येथून पुणे, खेड, रत्नागिरी, मुंबई, महाड, निजामपूर, अलिबाग, जोगेश्वरी, इंदापूर, म्हसळा, रोहा इत्यादी ठिकाणी गणेशमूर्ती जात असतात," असे ते म्हणाले.

# 'अलिबागमध्ये जनरल अरुणकुमार वैद्य यांच्या स्मारकासाठी प्रयत्न करणार'

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारताचे माजी लष्करप्रमुख जनरल अरुणकुमार वैद्य हे अलिबागचे सुपुत्र आहेत. त्यांचे प्राथमिक शिक्षणही अलिबाग येथे झाले. भारताचे अखंडत्व टिकविण्यासाठी त्यांनी ऑपरेशन ब्ल्यू स्टार केले. पण ते अतिरेक्यांच्या हिटलिस्टमध्ये गेले. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर १० ऑगस्ट १९८६ रोजी अतिरेक्यांकडून त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. शहीद वैद्य यांचा १० ऑगस्ट हा स्मृतिदिन शासकीय इतमामाने अलिबाग येथे साजरा करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करेन, असे प्रतिपादन रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.



माजी लष्करप्रमुख जनरल अरुणकुमार वैद्य यांचा स्मृतिदिन अलिबाग येथील शिशु विहार प्राथमिक शाळेत साजरा झाला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हाधिकारी किशन जावळे, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, उपनगराध्यक्षा मानसी म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर, आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील उपस्थित होते. प्रारंभी जनरल अरुणकुमार वैद्य यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी जावळे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

स्वागतपर भाषणात पत्रकार बळवंत वालेकर यांनी माजी लष्करप्रमुख जनरल वैद्य यांचा स्मृतिदिन अलिबाग येथे शासकीय इतमामाने साजरा व्हावा तसेच त्यांचे स्मारक अलिबाग या जन्मगावी व्हावे अशी शासनाकडे मागणी केली. कार्यक्रमास माजी जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रसाद पाटील, माजी नगरसेवक सुकुमार भगत, प्राध्यापक पी.जी. गोखले, विलास तांडेल आदी उपस्थित होते.

# राज्यात १५ ऑगस्टपासून जलसंधारण सप्ताह आणि अभियान; २१ ऑगस्टला राज्यभरात महावॉकेथॉन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचे स्मरण करत त्यांचा जन्मदिवस २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाने राज्यभरात व्यापक उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात १५ ऑगस्ट ते २१ ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह' आणि १५ ऑगस्ट ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबवले जाणार आहे.

या मोहिमेचा मुख्य उद्देश राज्यातील युवा पिढीला जल आणि मृद संधारणाचे महत्त्व पटवून देऊन या चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग वाढवणे हा आहे. जलसंधारण दिनानिमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये 'महावॉकेथॉन – वॉक फॉर वॉटर' या राज्यव्यापी उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. "पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा" या घोषवाक्यासह ही तीन किलोमीटरची वॉकेथॉन सर्व जिल्ह्यांत सकाळी ६ वाजता सुरू होईल.

यात सहभागी सर्व नागरिक मृद व जलसंधारणाची शपथ घेतील. १५ वर्षांवरील सर्व पुरुष व महिला नागरिकांसाठी खुली असलेल्या या वॉकेथॉनमध्ये लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, विद्यार्थी, क्रीडापटू, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन रायगड जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या उपक्रमाची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीवर सोपवण्यात आली असून सहभागींना टी–शर्ट, कॅप, डिजिटल प्रमाणपत्रे व बक्षिसे दिली जाणार आहेत.

तरुण पिढीला जोडण्यासाठी युवकांसाठी 'रील फॉर सोइल अँड वॉटर कन्झर्वेशन' ही राज्यव्यापी इन्स्टाग्राम रील स्पर्धा होईल.

# धावीर महाराज नामसप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता

**धाटाव** : गेल्या १२५ वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या श्री धावीर महाराज नामसप्ताहाचे यंदाचे १२६ वे वर्ष ब्राह्मण मंडळ रोहाच्या वतीने भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. सात दिवस चाललेल्या या नामसप्ताहात विविध धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना भाविक तसेच समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

ब्राह्मण मंडळ रोहाचे अध्यक्ष अमित आठवले, नामसप्ताहाचे सप्ताहप्रमुख जयेश गोडबोले तसेच मंडळाचे सचिव निखिल दाते यांच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक सोहळा पार पडला. मंडळाच्या सर्व कमिटी सदस्यांसह ब्राह्मण समाजातील ज्येष्ठ–श्रेष्ठ व्यक्ती, महिला, युवक तसेच समाजबांधवांनी नामसप्ताहाच्या आयोजनात उत्स्फूर्त सहभाग घेतला. सात दिवसांच्या या नामसप्ताहादरम्यान विविध भजन, कीर्तन तसेच समाजाला सकारात्मक दिशा देणारी आणि चांगला संदेश देणारी व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात सातही दिवस भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.नामसप्ताहाच्या सांगतेनिमित्त श्री धावीर महाराजांचा पारंपरिक पालखी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने पार पडला. पालखी सोहळ्यात समाजातील विविध स्तरांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. भाविकांनी श्री धावीर महाराजांचे दर्शन घेत पालखी सोहळ्याचा भक्तिभावाने आनंद घेतला. यानंतर रात्री शेजारतीने श्री धावीर महाराज नामसप्ताहाची सांगता करण्यात आली.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक २९/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील जॅकवेल येथील जुने मॅनिफोल्ड बदलणे व संबंधित उपकरणांची दुरुस्ती करणे. | ₹ ३९,०५,८९२.०० |
| २ | विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील उर्ध्व, गुरुत्व जलवाहिन्या व जलवितरण वाहिन्यांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३६,१४,७९३.०० |
| ३ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना, निवासी इमारत आणि अनिवासी इमारतींची देखभाल व दुरुस्ती.... महाड औद्योगिक क्षेत्रातील जलशुद्धीकरण केंद्र परिसरातील कर्मचारी वसाहत, नांगलवाडी कर्मचारी वसाहत, अग्निशमन केंद्र व एचएसआर परिसराची सन २०२६-२०२७ करिता वार्षिक तत्वावर साफसफाई व देखभाल करणे. | ₹ ३३,५८,१८८.०० |
| ४ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील ई-लेआउट जल उदंचन केंद्र व ई-लेआउटमधील एचएसआरची २ वर्षांच्या कालावधीसाठी परिचालनाची सेवा पुरविणे. | ₹ ३७,६६,४४०.०० |
| ५ | इसाम्बे औद्योगिक क्षेत्र... इसाम्बे औद्योगिक क्षेत्राला वीज पुरवठ्याच्या पायाभूत सुविधा पुरवणे... २२ केव्ही लाईन फीडरचे ०.१ चौ. इंचावरून ०.२ चौ. इंचाच्या एसीएसआर कंडक्टरमध्ये अपग्रेडेशन करणे. | ₹ १,२९,७३,८२४.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १४/०८/२०२६ ते दिनांक २८/०८/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १८/०८/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २०/०८/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः–

**मौजे बोलें, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| भुमापन नं. / हि. नं. | क्षेत्र | आकार रु. पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १०७ | एकूण क्षेत्र ०–३५–७०<br>पैकी ०–१४–००<br>+ पो.ख. ०–०२–००<br>एकूण ०–१६–०० | २.२८ | १. विराज व दिक्षा याचे अ.पा.क आई निता दिलीप पाटील.<br>२. संगिता दत्तात्रेय कुरंगळे<br>३. अरुण सुदाम पाटील<br>४. ताराबाई सुदाम पाटील<br>५. दिक्षा दिलीप पाटील<br>६. रामचंद्र नामा पाटील<br>७. विठाबाई कमलाकर पाटील<br>८. निता दिलीप पाटील<br>९. विराज दिलीप पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती. तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.


दि.१२/०८/२०२६.

**सही/–**

**ॲड. प्रशांत अशोक भुजबल**

कार्यालयः २. आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ 'अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेलता. पनवेल, जि. रायगड

मो. क्र.: ९९३०३६९८६१

मुरूड : खोरा बंदरातील समुद्र किनाऱ्यावर लाटांचा जोर वाढला असून जोराचे वारे वाहत आहेत. उधाणाच्या मोठ्या भरतीमुळे तालुक्यातील सर्वच समुद्र किनाऱ्यांवर समुद्राच्या मोठमोठ्या लाटा उसळत असून ते दृश्य सुधीर नाझरे यांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपले आहे.


## नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH2023-CC-0838E मध्ये समविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-BP 5026 चे मालक **राम तुळशीराम पाटील** यांचे तारीख १२/०४/२०२५ रोजी निधन झालेले आहे.

मी नंदिनी राम पाटील, घर क्रमांक ३३१ ओल्ड पनवेल उरण रोड मु.डुंगी, पो. पारगांव, ता. पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – नंदिनी राम पाटील**
**पत्ता– घर क्रमांक ३३१ ओल्ड पनवेल उरण रोड मु.डुंगी, पो. पारगांव, ता. पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६**



वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर



## Tender Notice

MAHAVITARAN

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/e-Tender/T-06/ 2026-27 | Work Contract for Supply, erection, testing & commissioning of 22 kV Lightning Arrestors for DTC and its allied works on "Turnkey basis under Goregaon Division (As per MSEDCL specification) | 10.00 | 10,000/- | 1000 + 18%GST = 1180/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 12.08.2026 to Dt. 19.08.2026. Submission of Bid is up to Dt. 20.08.2026 till 18.00 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Dy. Executive Engineer Tel No. 9029145594. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

PRO No. 087

**Executive Engineer, Goregaon Division**

# पनवेलमध्ये हर घर तिरंगा अभियान

## विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर हर घर तिरंगा अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल आदर, राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने मंगळवारी (दि. ११) पिल्लई आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पनवेल आणि केएलई महाविद्यालय ज्युनिअर येथे रांगोळी स्पर्धा व वंदे मातरम् माहिती प्रदर्शनाच्या माध्यमातून राष्ट्रभक्तीचा जागर करण्यात आला. हर घर तिरंगा अभियानाची महापालिका क्षेत्रात प्रभावी अंमलबजावणी करण्यास ९ ऑगस्टपासून सुरुवात झाली असून महाविद्यालयीन विद्यार्थी आणि युवकांचा अभियानात मोठ्या प्रमाणात सहभाग सुनिश्चित करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

पिल्लई आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. गजानन वाडेर यांच्या प्रमुख उपस्थितीत हर घर तिरंगा अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी रांगोळी स्पर्धा आणि वंदे मातरम माहिती प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. तसेच केएलई महाविद्यालय ज्युनिअर येथेही हर घर तिरंगा अभियानांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन आवळे यांच्या उपस्थितीत अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी रांगोळी स्पर्धा तसेच वंदे मातरम माहिती प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### ‘तिरंग्यासोबत सेल्फी काढून अभियानात सहभागी व्हा’

हर घर तिरंगा अभियानाच्या माध्यमातून नागरिकांनी घरावर अभिमानाने तिरंगा फडकवावा. तिरंग्यासोबत सेल्फी काढून harghartiranga.com या संकेतस्थळावर सेल्फी अपलोड करावी. तसेच #SelfieWithTiranga या हॅशटॅगसह सोशल मीडियावर पोस्ट करून देशभक्तीचा संदेश पोहचवावा.

# पावसाळी साथरोगांचे प्रमाण वाढले

## तातडीने आरोग्य शिबिरे भरवण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळ्यामध्ये नवी मुंबई शहरामध्ये साथीच्या आजारांचे प्रमाण वाढल्याने तातडीने वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करण्याची मागणी अखिल भारतीय माथाडी युनियनचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडे एका लेखी निवेदनातून केली आहे.

सध्या मुसळधार पाऊस नवी मुंबई शहराला झोडपून काढत आहे. शहरामध्ये ताप, मलेरिया, डेंग्यू व अन्य साथीच्या आजारांचा उद्रेक झालेला आहे. खासगी दवाखाने व रुग्णालये, पालिकेची नागरी आरोग्य केंद्रे तसेच माता-बाल रुग्णालयात रुग्णांची गर्दी पाहावयास मिळते. त्यामुळे




महापालिका प्रशासनाने नवी मुंबई शहरातील सर्वच प्रभागांमध्ये तातडीने आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे. नागरिकांची वैद्यकीय तपासणी करावी. घरोघरी जाऊन आजारी रुग्णांची रक्ततपासणी करावी. खासगी रुग्णालयांना डेंग्यू व अन्य आजारांच्या रुग्णांची माहिती कळविण्याबाबत कडक निर्देश द्यावेत, जेणेकरून आपणास रुग्णांचा आकडा व साथीच्या आजाराचे गांभीर्य निदर्शनास येईल.

मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्येही शिबिरांचे आयोजन करावे. नागरिकांची घरटी वैद्यकीय तपासणी करण्यात यावी. त्यामुळे साथीच्या आजाराचा शहरामध्ये झालेला उद्रेक पाहता आपण आरोग्य विभागाला शहरातील सर्वच प्रभागांमध्ये तातडीने वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# स्विमिंग टँकमध्ये बुडून वयोवृद्धाचा मृत्यू

**नवीन पनवेल** : स्विमिंग पूलमध्ये पोहण्यासाठी उतरले असता पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना वाजेगाव येथे घडली. पॉल के. इग्नेशसे (६४, रा. नवीन पनवेल) असे मृत्यू झालेल्या इसमाचे नाव आहे. ९ ऑगस्ट रोजी दुपारी दोनच्या सुमारास वाजेगाव येथील वाइल्ड लाईफ फॉर्म येथील स्विमिंग पूलमध्ये पॉल के. इग्नेशसे पोहण्यासाठी स्विमिंग पूलमध्ये उतरले होते. पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# गॅस बिलाच्या नावाखाली ऑनलाइन फसवणूक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गॅस बिल अपडेट करायचे आहे असे सांगून गॅसची बनावट फाइल डाऊनलोड करण्याची लिंक पाठवली आणि मोबाइलचा अ‍ॅक्सेस मिळवून आठ लाख ३९ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात १० ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील तक्रारदार सतीश पिल्लाई हे खुटुक बंधन, गाव सेक्टर ३५, खारघर येथे राहतात. २ ऑगस्ट ते ८ ऑगस्टदरम्यान त्यांना मोबाइलवर एका अनोळखी इसमाने कॉल केला आणि महानगर गॅस कार्यालयातून बोलत असल्याचे सांगून गॅस बिल अपडेट करणे बाकी असल्याचे सांगितले. त्यानंतर व्हॉट्सअपवर 'गॅस एफ' नावाची बनावट फाइल पाठवून डाऊनलोड करण्यास सांगितले. लिंक डाऊनलोड केल्यानंतर समोरील इसमाने पिल्लाई यांच्या मोबाइलचा अ‍ॅक्सेस मिळवून त्यांच्या बँक खात्यातून आठ लाख ३९ हजार रुपये काढून घेतले.

# बैल कत्तलप्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोवंश जातीच्या बैलाची कत्तल करून तीन बैलांना बेशुद्ध केल्याप्रकरणी सोहेल रियाज काझी, अकिब दावलकर आणि बिलाल गुलाम मोहम्मद पटेल (रा. तळोजा गाव) आणि इतर दोन अनोळखी इसमांविरोधात १० ऑगस्ट रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सकाळी साडेसहाच्या सुमारास पेंधर फाटा रेल्वे ब्रिज आणि एल अँड टीचे काम सुरू असलेल्या इमारतीदरम्यान बिलाल गुलाम मोहम्मद पटेल यांच्या भंगार दुकानाच्या मागील शेडमध्ये सोहेल काझी, अकिब दावलकर, बिलाल पटेल आणि दोन अनोळखी इसमांनी गोवंश जातीच्या बैलाची कत्तल केली. तसेच इतर तीन बैलांना इंजेक्शन देऊन बेशुद्ध केले होते.

या प्रकाराची माहिती सामाजिक कार्यकर्त्यांना मिळाल्यानंतर त्यांनी त्या ठिकाणी छापा टाकला. काही जण घटनास्थळावरून पळून गेले. पोलिसांना माहिती देताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# ड्रग्जमुक्त रायगड अभियानाचा रसायनीतून शुभारंभ

## विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती; शंकांचे निरसन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नशामुक्त भारत या संकल्पनेतून रायगड जिल्ह्यात व्यसनमुक्तीची जनजागृती करण्यासाठी रायगड पोलिसांनी ‘कॅम्पस कनेक्ट ड्रग्जमुक्त रायगड’ अभियानाची सुरुवात केली आहे. या अभियानाचा शुभारंभ मंगळवारी (दि. ११) रसायनीतील पिल्लई एचओसी एज्युकेशनल कॅम्पसमध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. आंचल दलाल यांच्या उपस्थितीत करण्यात आला.



अभियान रायगड जिल्ह्यात सर्वत्र राबविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. यावेळी बोलताना इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख डॉ. जगदीश बाकल यांनी पोलीस विभागाने हाती घेतलेला हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगितले. विविध प्रकारच्या व्यसनांपासून तरुणांना दूर ठेवून त्यांच्यातील सकारात्मक व सशक्त व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी हे अभियान महत्त्वाचे असल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत ड्रग्जसंदर्भातील अनेक प्रश्न उपस्थित केले. “ड्रग्ज तयार कुठे होतात? ते येतात कुठून? त्यावर पूर्णपणे बंदी का घातली जात नाही?” असे प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारले.

अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करत व्यसनमुक्त समाजासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. आंचल दलाल म्हणाल्या की, पुढील पिढी उद्ध्वस्त होण्यापासून वाचवण्यासाठी देशात ‘ड्रग्ज फ्री इंडिया’ ही मोहीम राज्यासह जिल्ह्यात राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. ड्रग्जचे जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी पोलिसांचे सातत्याने प्रयत्न सुरू असून, तरुणाई या विळख्यात सापडून त्यांचे नुकसान होऊ नये यासाठी सर्वत्र नशामुक्ती अभियान राबविण्यात येत आहे. त्यांनी यावेळी एनडीपीएस कायद्यांतर्गत विविध कलमांची माहिती देत नागरिकांना जागरूक राहण्याचे आवाहन केले.

यावेळी विद्यार्थी, शिक्षक यांच्यात नशामुक्तीवर संवाद झाला. यासाठी अँटी नार्कोटिक्स हेल्पलाइन १९०८ तसेच नॅशनल डी-अ‍ॅडिक्शन हेल्पलाइन ‘मानस’ १४४४६वर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. आंचल दलाल, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल, पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ, डॉ. जगदीश बाकल, आशा की किरण फाउंडेशन रिएक्ट सेंटरचे सायकॉलॉजिस्ट किशोर पाटील, संदीप पाटील, पिल्लईचे अमर मांगे सर, खालापूर तालुक्यातील पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंता ठोंबरे पाटील यांच्यासह रायगड जिल्ह्यातील अनेक पोलीस अधिकारी व मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

## श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात

# विद्यार्थी अधिकार पदग्रहण सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात विद्यार्थ्यांचा २०२६-२७चा अधिकार पदग्रहण सोहळा मोठ्या थाटात व उत्साहात साजरा करण्यात आला. मतदान प्रक्रियेच्या माध्यमातून अनेक जबाबदारीची पदे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी ग्रहण केली.



जणू काही संपूर्ण विद्यालयाच्या वेगवेगळ्या शाखांची जबाबदारी त्यांनी सांभाळली आहे असे भासत होते. विद्यार्थ्यांनी एकमताने निवडून दिलेले विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी मोठ्या थाटात पदग्रहण सोहळ्याचा आनंद घेताना दिसत होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी सुंदर अशी भाषणे करत आपल्याला मिळालेल्या पदांचे वर्णन केले तसेच वर्षभर विद्यालयात वेगवेगळे उपक्रम कसे राबवणार किंवा आपल्याला मिळालेले पद हे कशा प्रकारे सांभाळता येईल याचेदेखील सर्व विद्यार्थ्यांनी वर्णन केले.

सोहळ्यानिमित्त अनेक विद्यार्थ्यांची विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून २०२६-२७ साठी निवड करण्यात आली. यावेळी अ‍ॅड. राहुल घरत (मेंबर ज.भ.शि.प्र.संस्था), संतोष चव्हाण (एज्युकेशन इन्स्पेक्टर), चंद्रकांत घरत (चेअरमन भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय), सीमा घरत, सुनील पाटील तसेच सर्व पालक प्रतिनिधी उपस्थित होते. या सोहळ्यादरम्यान विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे तसेच उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते निवडलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानाने त्यांनी स्वीकारलेल्या पदाचा भार सोपवण्यात आला.



**पनवेल** : महानगरपालिकेच्या प्रभाग समित्यांच्या निवडणुकीत भाजपच्या चारही उमेदवारांची बिनविरोध निवड झाली. प्रभाग समिती अ मधून रवींद्र भगत, ब मधून मधू पाटील, क मधून रवींद्र जोशी आणि ड मधून अजय बहिरा विजयी झाले. नवनिर्वाचित सभापतींनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक मनोज भुजबळ, विकास घरत, सरस्वती काथारा, प्रियांका कांडपिळे, बायजा बारगजे, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, शहर सरचिटणीस रुपेश नागवेकर, युवा मोर्चाचे पनवेल शहर अध्यक्ष हिमेश बहिरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# समुद्राच्या हाकेला कोळी बांधव सज्ज!

**नवी मुंबई : बातमीदार**

समुद्राला दिलेली विश्रांती आता संपत आली असून नव्या मासेमारी हंगामाच्या स्वागतासाठी कोळीवाड्यांमध्ये लगबग सुरू झाली आहे. महाराष्ट्र शासनाने सागरी मत्स्यसंपत्तीचे संवर्धन आणि मासळीच्या प्रजनन काळाचे संरक्षण करण्यासाठी १ जून ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांवर बंदी लागू केली होती. आता ही बंदी संपण्यास काही दिवस शिल्लक असताना कोळीवाड्यांमध्ये मासेमारीच्या तयारीला वेग आला आहे.



यावेळी मुंबईसह नवी मुंबईतील बंदरकिनारी जाळी विणणे, जुन्या जाळ्यांची डागडुजी, होड्यांची रंगरंगोटी, इंजिनांची दुरुस्ती तसेच मासेमारीसाठी लागणाऱ्या विविध साधनसामग्रीची जमवाजमव सुरू झाली आहे. यामुळे मासेमारी हंगाम सुरू होण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या कोळी बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली तयारी आता अंतिम टप्प्यात आली असून समुद्रात पुन्हा होड्या उतरवण्याची आतुरता वाढली आहे.वर्षभर समुद्राशी नाते जोडून उपजीविका करणाऱ्या कोळी बांधवांसाठी मासेमारी बंदीचा काळ हा समुद्राला विश्रांती देतानाच स्वतःच्या साधनसामग्रीच्या दुरुस्तीचा आणि नव्या हंगामाच्या तयारीचा काळ असतो.

यामुळे सध्या कोळीवाड्यांमध्ये कुठे जाळ्यांवर काम सुरू आहे, तर कुठे होड्यांना रंगाचा नवा थर चढवला जात आहे. अनेक ठिकाणी इंजिनांची तपासणी आणि दुरुस्तीची कामेही अंतिम टप्प्यात आली आहेत. विशेष म्हणजे कोळी समाजाच्या जीवनात नारळी पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. समुद्राला नारळ अर्पण करून समुद्रदेवतेची पूजा केली जाते आणि सुरक्षित, भरघोस मासेमारी हंगामासाठी प्रार्थना केली जाते. त्यामुळे नारळी पौर्णिमा जवळ येत असताना कोळीवाड्यांतील उत्साह आणखी वाढला असल्याचे दिवाळे कोळीवाड्यातील किशोर कोळी यांनी यावेळी सांगितले.

# बारवरील छाप्यात नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका पोलिसांनी हॉटेल टाइम्स बार अँड रेस्टॉरंट, कोनगाव येथे छापा टाकून नऊ जणांविरोधात ११ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल केला आहे. १० ऑगस्ट रोजी रात्री एकच्या सुमारास कोनगाव येथील हॉटेल टाइम्स बार अँड रेस्टॉरंटमध्ये सहा महिला अंगात तोकडे कपडे घालून अश्लील हावभाव करताना आढळल्या.

येथील मॅनेजर सचिन एस. कोटियन (रा. गोकुळ सोसायटी, डेरवली) आणि दोन पुरुष वेटर हे त्यांना उत्तेजन आणि प्रोत्साहन देत होते. पोलिसांनी छापा टाकल्यानंतर मॅनेजर, वेटर आणि महिलांसह एकूण नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विद्याभवनमध्ये अमली पदार्थविरोधी जनजागृती अभियान; विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ

**नवी मुंबई : बातमीदार**

विद्याभवन शिक्षण संकुलामध्ये नेरुळ पोलीस स्टेशन व विद्याभवन शिक्षण संकुलाच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १०) अमली पदार्थविरोधी जनजागृती अभियानांतर्गत मार्गदर्शक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश चव्हाण यांनी इयत्ता ५ वी ते १२वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना अमली पदार्थांमुळे होणारे नुकसान व त्याचे वाईट परिणाम यांची जाणीव करून दिली. तसेच व्यसनापासून व चुकीच्या संगतीपासून दूर राहण्याचे आवाहन केले.

जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर चांगले मित्र बनवणे आणि उत्तम आरोग्य राखणे महत्त्वाचे असल्याचे सांगत व्यायामाचे महत्त्वही त्यांनी विषद केले. अमली पदार्थांच्या सेवनाबत सतर्क राहून कोणत्याही संशयास्पद गोष्टीची माहिती पोलीस संपर्क क्रमांकावर देण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली.नवी मुंबई पोलीस आयोजित रिल मेकिंग व पोस्टर मेकिंग स्पर्धांची माहितीही विद्यार्थ्यांना देण्यात आली.

यावेळी नेरुळ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक अजय कांबळे, पोलीस निरीक्षक गुन्हे पंकज धाडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश चव्हाण, पोलीस हवालदार जावेद बागवान, मुख्याध्यापक गोरख कदम, श्रीजा नायर, समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. सुजय वाबळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



# कर्जतमधील नागरी प्रश्नांवर पालिकेला घेराव

## ◆ कर्जत बचाव समितीकडून एक महिन्याचा अल्टिमेटम

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील नागरी प्रश्नांवर आक्रमक असलेल्या कर्जत बचाव समितीकडून नगर परिषदेमध्ये आवाज उठवण्यात आला. बचाव समितीच्या आक्रमक भूमिकेमुळे पालिकेतील सत्ताधारी कर्जत परिवर्तन आघाडीच्या नेत्यांनी उपस्थिती लावली. एक महिन्याच्या आत बहुसंख्य प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन दिल्याने एक महिन्यातील शहरातील नागरी प्रश्नांवर मार्ग निघेल अशी अपेक्षा आहे, मात्र तसे न झाल्यास समिती पुढील आवश्यक ती पावले उचलणार आहे.



कर्जत शहरातील विविध नागरी समस्यांबाबत कर्जत बचाव समितीच्या आवाहनानंतर कर्जत नगर परिषदेकडून बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी नगराध्यक्ष पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, सत्ताधारी गटनेते महेंद्र चंदन आणि मुख्याधिकारी तानाजी चव्हाण आदींसह कर्जत परिवर्तन आघाडीचे नगरसेवक-नगरसेविका उपस्थित होते. कर्जत शहर बचाव समितीच्या वतीने अ‍ॅड. कैलास मोरे तसेच अनेक नागरिक उपस्थित होते. कर्जत परिवर्तन आघाडीकडून सुधाकर घारे, नितीन सावंत, राजेश लाड आदी प्रमुख उपस्थित होते. बचाव समितीचे रंजन दातार, विजय बेडेकर, स्विटी बार्शी, सुरेश खानविलकर, अमीर मणियार, विजय गोखले, लोकेश यादव, प्रशांत उगले, विद्या वणगे, सोमनाथ पालकर, बिलाल आढाळ, सुनील जाधव, धर्मेंद्र मोरे आदी उपस्थित होते.

समन्वयक अ‍ॅड. कैलास मोरे यांनी पालिका नागरिकांच्या प्रश्नावर सकारात्मक दिसून येत नाही, अशी टीका केली. राजेश लाड यांनी नगर परिषद मुख्याधिकारी यांनी शहरात फिरून जनतेशी संवाद साधावा, अशी सूचना केली, तर नगर परिषदेमधील विभागप्रमुख नवीन आहेत आणि त्यांना या सर्व अधिकाऱ्यांना नागरी समस्यांबाबत कार्यक्षम करण्याचे काम मुख्याधिकाऱ्यांनी करावे, असे सांगितले.

सुधाकर घारे यांनी यावेळी बोलताना, शहरात मागील आठ महिने झाले असून विकासकामांची गती नाही हेदेखील नागरिक बघत आहेत. या ठिकाणी मांडलेले विषय मार्गी लागणे आवश्यक होते. पालिकेच्या प्रशासनाने शासनाकडे कोणता पाठपुरावा केला, तर याबाबत कोणत्याही प्रकारचा पाठपुरावा दिसून येत नाही. ३५ प्रश्न मांडले आहेत त्यातील अनेक प्रश्न पाठपुरावा करण्याजोगे होते, पण प्रशासनाने काहीही केले नाही. शहरातील नागरिकांची बाजू मांडण्याचे काम पालिका करीत आहे. शहरात पाणीपुरवठा, वाहतूक, आरोग्य याबाबत पालिकेचे काम समाधानकारक दिसत नाही. लहान विषय गणपतीपूर्वी सुटतील, अशी अपेक्षा असून नगर परिषद आणि बचाव समिती यांनी समन्वयातून काम करू या.' असे आवाहन केले.

नितीन सावंत यांनी, पाणी आणि पार्किंग ही सर्वात मोठी समस्या आहे. नगर परिषद जुनी इमारत येथे पार्किंग व्यवस्था करावी. शनी मंदिर भागातील नगर परिषद मालकीची मोकळ्या जागेत पार्किंग करावी, असे सूचित केले. बाजारपे मधील हातगाड्यांवर लोकांची नावे लिहिण्यात यावीत. त्यावेळी श्रीमंत लोक आपली नावे लावणार नाहीत आणि त्यामुळे अर्ध्या गाड्या बंद होतील. पार्किंगची समस्या सुटावी यासाठी पी १, पी २ अशी व्यवस्था सुरू करावी. निर्णय वेळेवर घेतले, तर शहरातील अर्धे नागरी विषय मार्गी लागतील, असा आशावाद व्यक्त केला. बचाव समिती ही कर्जत शहराच्या विकासाचा आरसा आहे. त्यामुळे नागरी प्रश्न पालिकेने समजून घ्यावेत, अशी मागणी केली.

समितीचे रंजन दातार यांनी केडरमुळे अनेक नवीन अधिकारी आले असून कोणत्या विभागाचे अधिकारी आहेत हेच नागरिकांना माहिती नाही याकडे लक्ष वेधले. ज्येष्ठ नागरिक विजय गोखले यांनी अभिनव शाळेपासून नगर परिषद या रस्त्यावर वाहने कायम लावलेली असतात, तर शहरात अनेक ठिकाणी वन वे ट्रॅफिक कार्यान्वित केली जात नाही. चारफाटा येथे सिग्नल यंत्रणा बसवली आहे, पण ते सिग्नल सुरू झाले नाहीत, हे निदर्शनास आणून दिले.

## मोरबे येथे गटार बांधकामाचे भूमिपूजन

**चौक : प्रतिनिधी**

मोरबे धरणग्रस्त वसाहत मोरबे येथे गटार योजनेच्या बांधकामाचे भूमिपूजन सरपंच रितू ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आले. पंचायत समिती सेस निधीतून गटार योजनेचे काम मंजूर झाले आहे.

भूमिपूजन समारंभास उपसरपंच नैना झिंगे, ग्रामपंचायत अधिकारी गणेश मोरे, सदस्य सौ.राणे, पिंट्या राणे यांच्यासह मोरबे धरणग्रस्त वसाहतमधील नागरिक उपस्थित होते.

यावेळी मोरबे धरणग्रस्त महिलांनी गावच्या नागरी सुविधा कामाला मंजुरी दिल्याबद्दल सभापती कृष्णा पारंगे, उपसभापती भाई शिंदे, गटविकास अधिकारी संदीप कराड व पंचायत समिती यांचे आभार व्यक्त केले.



## वाघोशी शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतले शेतीकामाचे धडे

**पाली : प्रतिनिधी**

भारत हा कृषिप्रधान देश असून येणाऱ्या काळात सेंद्रिय शेतीला अत्यंत महत्त्व प्राप्त होणार आहे. शेतकरी म्हणजे बळीराजा. प्रत्यक्ष शेती करताना त्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. शेतकरी हा जगाचा पोशिंदा असल्याने विद्यार्थ्यांना शेतीच्या कामांबद्दल प्रत्यक्ष अनुभव मिळणे फार महत्त्वाचे आहे. याच उद्देशाने क्षेत्रभेटी अंतर्गत रजिप आदर्श शाळा वाघोशी येथील विद्यार्थ्यांनी शेतात उतरून भात लावणीचा मनसोक्त आनंद घेतला.



मुख्याध्यापक राजेश जाधव यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी वाघोशीमधील शेतकरी बबन देशमुख यांच्या शेतावर भेट दिली. निसर्गप्रेमी शिक्षक जनार्दन भिलारे यांनी विद्यार्थ्यांना प्रथम भाताची रोपे लावणीसाठी वाफ्यावरून अलग कशी करावीत व त्याचे मूठ कसे बांधावे याबद्दल प्रात्यक्षिक करून दाखवले. यानंतर चिखल केलेल्या जागी अलग केलेल्या रोपांची लावणी कशी करावी याबाबत माहिती देऊन विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून घेतले. विद्यार्थ्यांसोबत सहशिक्षिका किर्ती लामदाडे आणि सुवर्णा घोडे यांनीही शेतात उतरून लावणीचा आनंद घेतला. या उपक्रमासाठी शेतकरी मित्र बबन देशमुख व त्यांचे चिरंजीव उदय देशमुख आणि उमेश देशमुख यांनी मोलाचे सहकार्य केले. उपक्रम पूर्ण झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना देशमुख यांच्या वतीने खाऊ वाटप करण्यात आले.


या उपक्रमाचे उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे, गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे व गटविकास अधिकारी लता मोहिते यांनी विशेष कौतुक केले. तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा कविता देशमुख व सर्व सदस्य, पालक वर्ग, वाघोशीतील ग्रामस्थ आणि केंद्रप्रमुख गणेश बैकर यांनी या उपक्रमाबद्दल शाळेचे अभिनंदन केले.

## जिंदल स्कूलच्या आरव खेदूची आंतरराष्ट्रीय परिषदेत छाप

**मुरुड : प्रतिनिधी**

जिंदल विद्यामंदिर, साळावच्या विद्यार्थ्यांनी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या १५व्या वर्धापन दिन विशेष आंतरराष्ट्रीय भारतीय मॉडेल संयुक्त राष्ट्र परिषदेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. प्रतिष्ठित एनएमएसीसी आणि जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे ही परिषद पार पडली.

'भारतीय मार्ग' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित या परिषदेत सात देशांतील १०८ शहरांमधून तब्बल २,१०० विद्यार्थी प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला. जिंदल विद्यामंदिरचे २० विद्यार्थी प्रतिनिधी आणि दोन शिक्षक यांनी विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय तसेच विशेष समित्यांमध्ये सहभाग घेत शाळेचे प्रतिनिधित्व केले.




या परिषदेत आरव खेदू याने आपल्या प्रभावी वक्तृत्व, अभ्यासपूर्ण मांडणी, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर बेस्ट हाय कमेंडेशन हा प्रतिष्ठेचा पुरस्कार पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे जिंदल विद्यामंदिरच्या प्रतिनिधी मंडळाला द्वितीय क्रमांकाचे सर्वोत्तम प्रतिनिधी मंडळ म्हणून गौरव प्राप्त झाला.

आरव खेदू याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल लोकसभा अध्यक्ष सुश्री लावण्या गोलेरिया आणि नीती आयोगाचे अध्यक्ष सहजप्रीत सिंह यांच्या हस्ते त्याचा विशेष सत्कार करण्यात आला.

या परिषदेत विद्यार्थ्यांना विविध देशांतील आणि विविध क्षेत्रांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची, जागतिक प्रश्नांवर विचारमंथन करण्याची तसेच आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळाली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुण, संवादकौशल्य, चिकित्सक विचार, आत्मविश्वास आणि व्यापक दृष्टिकोनाला मोठी चालना मिळाली.

जिंदल विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेल्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मास्टर आरव खेदू आणि संपूर्ण विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाचे सर्व स्तरांतून कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

## अतिवृष्टी, बांधबंदिस्तीच्या नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांचे निवेदन



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतीसह बांध-बंदिस्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या नुकसानीची तातडीने नोंद घेऊन पंचनामे करण्यात यावेत. पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार नुकसानभरपाई व इतर शासकीय मदत मिळावी, अशी मागणी वरदविनायक शेतकरी सामाजिक संस्था, खानाव यांच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत संस्थेच्या माध्यमातून नायब तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील बांध-बंदिस्ती वाहून गेल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीची योग्य प्रकारे नोंद व पंचनामे न झाल्यास संबंधित शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे महसूल विभागाने तातडीने पाहणी करून नुकसानग्रस्त बांध-बंदिस्तीचे पंचनामे करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. याचबरोबर अनेक शेतकऱ्यांच्या फार्मर आयडी (शेतकरी परिचयपत्र)मध्ये त्यांच्या मालकीच्या काही सातबारा उताऱ्यांची नोंद झालेली नाही. त्यामुळे विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत. संबंधित सातबारा उताऱ्यांची पडताळणी करून ते फार्मर आयडीशी जोडण्यासाठी विशेष मोहीम राबवावी तसेच शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीसंदर्भातील अडचणी तातडीने दूर करण्यासाठी तालुकास्तरावर विशेष शिबिर आयोजित करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

## खोपोलीत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

लोहाणा महाजनवाडी समाज ट्रस्ट, आर झूनझूनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल आणि बुज हास्य क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विनामूल्य नेत्र तपासणी व विनामूल्य मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर सोमवारी संपन्न झाले. प्रतिमाह प्रमाणे लोहाणामध्ये हे ४६वे अखंडित शिबिर होते.


लोहाणा महाजन समाज ट्रस्ट अध्यक्ष शैलेश विठलाणी, मार्गदर्शक संजय तन्ना आणि बुज हास्य क्लब संस्थापक बाबुभाई ओसवाल यांच्या अधिपत्याखाली झालेल्या या शिबिरात ५८ नेत्र रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २६ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी डॉ. सुजय कोल्हापुरे यांच्यासमवेत पनवेल येथे रवाना करण्यात आले.



## माथेरान घाटात धुक्याची दाट चादर

**माथेरान : बातमीदार**

माथेरान परिसरात सध्या पावसाळी पर्यटन बहरले असून नेरळ-माथेरान घाटरस्त्यावर दाट धुक्यामुळे वाहनचालकांची मोठी परीक्षा होत आहे. घाटातील काही ठिकाणी इतके दाट धुके असते की, अवघ्या काही मीटर अंतरावरील वाहनदेखील दिसत नाही. त्यामुळे अपघाताची शक्यता वाढली असून वाहनचालकांना हेडलाईट व साईड लाईटच्या आधारे अत्यंत सावधपणे वाहतूक करावी लागत आहे.



माथेरान हे थंड हवेचे प्रसिद्ध पर्यटनस्थळ असल्याने पावसाळ्यात येथे मोठ्या संख्येने पर्यटक दाखल होत आहेत. सध्या दररोज तीन ते चार हजार पर्यटक माथेरानला भेट देत असून शनिवार-रविवारी ही संख्या १५ हजारांहून अधिक होत आहे. त्यामुळे नेरळ -माथेरान घाटरस्त्यावर वाहनांची वर्दळही मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

जुम्मापट्टी धबधब्यापासून पुढे घाटातील अनेक भागात दाट धुक्याचा सामना वाहनचालकांना करावा लागतो. दिवसाच्या तुलनेत सायंकाळनंतर परिस्थिती अधिक गंभीर होते. रात्रीचा अंधार आणि त्यात दाट धुके यामुळे समोरून येणारे वाहन, रस्त्याची दिशा तसेच वळणे ओळखणे कठीण होत आहे. धुक्यातून वाहन चालवण्याचा अनुभव घेण्यासाठी काही पर्यटक उत्साहाने घाटरस्त्यावरुन प्रवास करत असले, तरी हा प्रवास धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. विशेषतः दुचाकीस्वारांनी रात्रीच्या वेळी घाटातून प्रवास टाळावा, अशा सूचना पोलिसांकडून देण्यात येत आहेत, मात्र काही पर्यटकांकडून या सूचनांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

दाट धुक्यामुळे अपघाताचा धोका लक्षात घेता वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवावे, सुरक्षित अंतर राखावे आणि आवश्यकतेनुसार हेडलाईट सुरू ठेवून प्रवास करावा, असे सूचित केले गेले आहे.

## माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कोपर प्राथमिक शाळा येथे सन २००१मधील इयत्ता चौथीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक अनंत कोळी आणि सुरेखा म्हात्रे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच शाळेतील सर्व कार्यरत शिक्षकांनाही सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सन २००१च्या रौप्यमहोत्सवी बॅचतर्फे शाळेला घड्याळे भेट देण्यात आली. शाळेबद्दलची आपुलकी आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा उपक्रम कौतुकाचा विषय ठरला. सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.





मुरुड : खोल समुद्रातील मासेमारीसाठी लाटांवर स्वार होऊन मच्छीमार बांधव बोटी घेऊन निघाले आहेत. (छाया : सुधीर नाझरे)

## चरई खुर्द ग्रामपंचायत अंतर्गत पावसाळी क्रीडा स्पर्धा

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील चरई खुर्द ग्रामपंचायतीच्या अंतर्गत पावसाळी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्या होते. या स्पर्धांचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले.

यावेळी मोहन जाधव, राजेश गायकर, सरपंच प्रवीण आंबार्ले, उपसरपंच अजय सावंत, दिनेश भोईर, माजी उपसरपंच लक्ष्मण भोईर आदी उपस्थित होते.

या स्पर्धांमध्ये धावणे, बकेटबॉल, चमचा लिंबू,तीन पायांची शर्यत अशा खेळांचे सामने रंगले. यात बेलघर, खैराट, चरई खुर्द, गौळवाडी, गौळवाडी आदिवासीवाडी या शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



धावणे स्पर्धेत दक्ष साळुंखे, अंजली कोळी, बकेट बॉलमध्ये दक्ष साळुंखे, सोनाक्षी हिलम, चमचा लिंबूमध्ये मल्हार साळुंखे, चैतन्या भोईर, तीन पायांची शर्यतीमध्ये मल्हार साळुंखे, दक्ष साळुंखे, रस्सीखेमध्ये जिल्हा परिषद शाळा चरई व गौळवाडी आदिवासीवाडी यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवून यश प्राप्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व चषक, भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

# सरफराजसाठी कर्णधार गिल आग्रही

## श्रीलंकेविरुद्ध प्लेइंग इलेव्हन निवडताना कसोटी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर आहे. श्रीलंकेविरुद्धच्या द्विपक्षीय कसोटी मालिकेसाठी दुखापतग्रस्त साई सुदर्शनच्या बदली खेळाडू म्हणून सरफराज खानला संघात स्थान मिळाले आहे, पण त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळणार का, हा मुद्दा चांगलाच चर्चेत आहे.

सराव सामन्यात देवदत्त पडिक्कल याने शतकी खेळीसह तिसऱ्या क्रमांकावरील दावेदारी भक्कम केली आहे. अशा वेळी सरफराजचा प्लेइंग ११मध्ये समावेश करायचा असल्यास गिलला ऋषभ पंत किंवा ध्रुव जुरेल यांच्यापैकी एकाला बाहेर ठेवावे लागेल. पंतची अलीकडची कामगिरी फारशी समाधानकारक राहिलेली नाही. अनेकदा अनावश्यक फटके खेळताना तो बाद झाला आहे. त्याच्या या आक्रमक आणि काही वेळा बेजबाबदार फलंदाजीचा फटका संघाला बसला आहे. त्यामुळे गिल सरफराजला प्लेइंग-११मध्ये स्थान देण्यासाठी पंतला बाहेर बसवले, तर तो एक धाडसी निर्णयच ठरेल.

पहिल्या कसोटी सामन्यात पंतच्या जागी यष्टिरक्षकाची जबाबदारी ध्रुव जुरेल सांभाळू शकतो. जुरेल चांगली फलंदाजीही करतो. तो खेळपट्टीवर टिकून फलंदाजी करण्यासोबतच पंतप्रमाणे आक्रमक फलंदाजीही करू शकतो. खालच्या क्रमांकावर भारताला अशाच प्रकारच्या फलंदाजाची गरज आहे, जो परिस्थितीनुसार संयमी आणि आक्रमक दोन्ही प्रकारची फलंदाजी करू शकेल. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, गिलला सरफराजला खेळवायचे आहे. त्यामुळे मधल्या फळीत भारताकडे एक चांगला कसोटी फलंदाज उपलब्ध होईल. जर संघाने पंतला प्लेइंग इलेव्हनमध्ये कायम ठेवण्याचा निर्णय घेतला, तर जुरेलला बाहेर बसावे लागू शकते. अशा परिस्थितीत पंत सहाव्या क्रमांकावर, तर सरफराज पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करू शकतो.

### 'डब्ल्यूटीसी'साठी चुरस

भारत आणि श्रीलंका यांच्यातील पहिला कसोटी सामना गॉलच्या मैदानावर रंगणार असून दोन्ही संघांसाठी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या दृष्टीने हा सामना महत्त्वपूर्ण आहे. शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया श्रीलंकेच्या भूमीवर पहिल्यांदाच कसोटी सामना खेळणार आहे. अशा वेळी टीम इंडियाचा दबदबा कायम राखण्याचे आव्हान गिलसमोर असेल.



# रोह्यात रंगली बुद्धिबळ स्पर्धा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यातील श्री प्रमोद म्हसकर सामाजिक प्रतिष्ठान पुरस्कृत आणि तालुका बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित जलद बुद्धिबळ स्पर्धेत तब्बल २४० खेळाडूंनी सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे या स्पर्धेत ४० मानांकित खेळाडूंनी सहभाग घेतल्याने स्पर्धेची रंगत आणखी वाढली.

स्पर्धेत खुला गट आणि १६ वर्षांखालील गट अशा दोन प्रमुख गटांमध्ये सामने खेळविण्यात आले. खुल्या गटात स्नेहल भोसले प्रथम, राहुल वर्मा द्वितीय, विश्वदीप जाधव तृतीय यांनी; तर १६ वर्षांखालील गटात विदेहा मेटकर प्रथम, गौतम सुरेश पवार द्वितीय, आर्या बळाराम जाधव तृतीय यांनी यश प्राप्त केले. स्पर्धेचे सूत्रसंचालन बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष अमर सलागरे यांनी केले.

# क्रिकेटपटू अभिषेक पोरेलला अटक

**कोलकाता : वृत्तसंस्था**

बंगालचा युवा क्रिकेटपटू अभिषेक पोरेलला लैंगिक शोषणाच्या आरोपांवरून अटक करण्यात आली आहे. कोलकाता उच्च न्यायालयाने अभिषेकच्या अटकेचे आदेश दिले होते. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या एका मुलीने अभिषेक व आणखी एका आरोपी अशा दोघांवर बलात्कारासह अन्य गंभीर आरोप केले होते.

२३ वर्षीय अभिषेक डोमेस्टिक क्रिकेटमध्ये बंगाल, तर आयपीएल स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्स संघाकडून खेळतो. प्रेम आहे सांगून लैंगिक शोषण करण्यात आल्याचा आरोप विद्यार्थिनीने केला आहे. खासगी फोटो इंटरनेवर प्रसारित करू अशी धमकी देऊन ब्लॅकमेल करण्यात आल्याचा आरोपही आहे. या संदर्भात मगरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब पनवेल आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा नुकतीच नवीन पनवेलमधील सिडको समाजमंदिरात झाली. स्पर्धेस उत्तम प्रतिसाद लाभला.

शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन लायन्स क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर प्रवीण सरनाईक आणि पनवेलच्या अध्यक्ष मंगला ठाकूर यांच्या हस्ते झाले. बक्षीस वितरण समारंभास मंगला ठाकूर यांच्यासह क्लबचे सेक्रेटरी मिलिंद सूर्यवंशी, स्पोर्ट्स प्रोजेक्ट चेअरमन राजेंद्र जेसवानी, नागेश देशमाने, अशोक गिल्डा, एस.जी. चव्हाण, मनोज म्हात्रे, मदन गोवारी, हेमंत ठाकूर, मोतीलाल जैन, नंदकिशोर धोत्रे, डायरेक्टर ज्योती देशमाने, भावना जेसवानी, अलका चव्हाण, लिओ क्लबचे अध्यक्ष सोहम व्यवहारे उपस्थित होते. स्पर्धेचे चीफ रेफरी म्हणून डी.आर.



साळसकर, शामल, पराग अंकोलेकर, योगेश पवार यांनी काम पाहिले. विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले तसेच सहभागी सर्व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. याखेरिज पुरुष व महिला विजयी खेळाडूंना संजय पोद्दार यांच्यातर्फे आई-वडिलांच्या स्मरणार्थ भव्य फिरता चषक देण्यात आला.

**गटनिहाय निकाल**

नवोदित : मुली-प्रथम सानवी काटकर (रायन इंटरनॅशनल स्कूल), द्वितीय सारा हसबनीस (पोद्दार इंटरनॅशनल नेरूळ), तृतीय इरा प्रसाद (एपीजय स्कूल नेरूळ) व इनाक्षी प्रुस्टी (गुरुकुल ब्राइट वर्ल्ड स्कूल); मुले-प्रथम साईश पेंडसे (दिल्ली पब्लिक स्कूल नेरूळ), द्वितीय जस्तेज सिंग मानेकतला (दिल्ली पब्लिक स्कूल नेरूळ), तृतीय दक्ष पटेल (रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर) व निर्वाण कांबळे (नवीन पनवेल); ११ वर्षांखालील मुली-प्रथम स्नेहल जाधव (सेंट जोसेफ स्कूल), द्वितीय अनुष्का जाधव (सेंट जोसेफ हायस्कूल नवीन पनवेल), मुले-प्रथम अर्णव साळावकर (डीडी विसपुते शाळा), द्वितीय रियान आशिष म्हात्रे (एपीजय स्कूल सीवूड्स), तृतीय कुशाग्र सिन्हा (बिर्ला ब्रेनिअक्स पनवेल); १३ वर्षांखालील : मुली-प्रथम सानवी बिरासदार (बालभारती स्कूल खारघर), द्वितीय आराध्या धेंडे (नवी मुंबई), मुले-प्रथम सिद्धांत तिरसे (बालभारती स्कूल खारघर), द्वितीय आराध्य अभिजीत पाटील (पेण एज्युकेशन सोसायटी स्कूल), तृतीय मल्लेश जाधव (दिल्ली पब्लिक स्कूल पनवेल); १५ वर्षांखालील : मुली-प्रथम अर्निशा निलेश भवर (लोढा वर्ल्ड स्कूल), द्वितीय त्रिशा शेखर पावशे (डीएव्ही स्कूल पनवेल), मुले-प्रथम अद्वित गुप्ता (दिल्ली पब्लिक स्कूल नेरूळ), द्वितीय अद्वैत रवींद्र पाटील (न्यू होरायझन स्कूल खांदा कॉलनी); १७ वर्षांखालील : मुली-प्रथम त्रिशा शेखर पावशे (डीएव्ही स्कूल पनवेल), द्वितीय अर्निशा निलेश भवर (लोढा वर्ल्ड स्कूल), मुले-प्रथम नील सतीश राठोड (महात्मा स्कूल खांदा कॉलनी), द्वितीय अद्वैत रवींद्र पाटील (न्यू होरायझन स्कूल खांदा कॉलनी); १९ वर्षांखालील : मुली-प्रथम अर्निशा भवर (लोढा वर्ल्ड स्कूल), द्वितीय मनस्वी मनोद टोकले (बालभारती पब्लिक स्कूल खारघर), मुले-प्रथम अद्वित गुप्ता (दिल्ली पब्लिक स्कूल नेरूळ), द्वितीय शौर्य कुमार रावत (बीएआरसी), तृतीय नील सतीश राठोड (महात्मा स्कूल खांदा कॉलनी) व अद्वैत रवींद्र पाटील (न्यू होरायझन पब्लिक स्कूल), महिला गट : प्रथम साताक्षी सिंग (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी खारघर), द्वितीय प्राची सातारडेकर (ओएनजीसी कॉलनी), तृतीय ज्योती सोनावणे (तळोजा), पुरुष गट : प्रथम लोकेश पटवा (खारघर), द्वितीय मनीष सकलानी (तळोजा), तृतीय अन्वर शेख (तळोजा) व सनीत पाटील (नवीन पनवेल), पुरुष ज्येष्ठ गट : प्रथम लोकेश पटवा (खारघर), द्वितीय मनीष सकलानी (तळोजा), तृतीय शक्ती कुमार (ओएनजीसी) व विजय यादव (नवीन पनवेल).

# तायक्वांडो चॅम्पियनशिपसाठी पनवेलच्या खेळाडूंची निवड

**पनवेल : वार्ताहर**

जेजुरी येथे नुकत्याच झालेल्या स्टेट ज्युनिअर ओपन स्टेट तायक्वांडो चॅम्पियनशिप २०२६ या राज्यस्तरीय स्पर्धेत तायक्वांडो असोसिएशन ऑफ पनवेल शहरच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली आहे. या स्पर्धेत पनवेलच्या खेळाडूंनी प्रत्येकी दोन सुवर्ण आणि कांस्यपदके जिंकली असून सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेत श्रीजय भगत आणि वीर भोईर यांनी



सुर्वण; तर यथार्थ कदम आणि गौरी कोळी यांनी कांस्यपदक प्राप्त केले. यापैकी श्रीजय आणि वीर यांची पुणे म्हाळुंगे येथे आयोजित होणाऱ्या पाचव्या इंडिया तायक्वांडो क्योरुगी नॅशनल चॅम्पियनशिप २०२६-२७ या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यशस्वी खेळाडूंचे पनवेल महापालिकेच्या नगरसेविका दर्शना भोईर, तायक्वांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप ओंबसे, सरचिटणीस अमजदखान (गफार) पठाण, खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी, तसेच पनवेल शहर तायक्वांडो असोसिएशनच्या अध्यक्ष ॲड. प्रज्ञा भगत, सचिव संजय भोईर, खजिनदार हेमंत कोळी, सहसचिव संदीप भगत यांनी विशेष कौतुक केले.

वीर तायक्वांडो असोसिएशन ऑफ पनवेलचे अध्यक्ष हरेश्वर भगत, सदस्य निखिल भोईर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन करत पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अफगाणिस्तान वनडे वर्ल्डकपसाठी पात्र



**बेलफास्ट : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानने पुढील वर्षी होणाऱ्या वनडे वर्ल्डकपसाठी थेट पात्र होण्याचा मान मिळवला आहे. कर्णधार रशीद खानच्या दिमाखदार प्रदर्शनाच्या बळावर अफगाणिस्तानने तिसऱ्या वनडेत आयर्लंडला नमवले. या विजयासह अफगाणिस्तानचा संघ पुढच्या वर्षी होणाऱ्या वनडे वर्ल्डकपसाठी पात्र ठरला आहे.

बेलफास्ट येथे झालेल्या तिसऱ्या वनडेत आयर्लंडने प्रथम फलंदाजी करताना २०६ धावांची मजल मारली. गॅव्हिने होयने ३६ धावांची खेळी केली. अफगाणिस्तानने ३४ अतिरिक्त धावांची खिरापत वाटली. अफगाणिस्तानतर्फे गनफझर आणि रशीद यांनी प्रत्येकी तीन विकेट्स पटकावल्या.

धावांचा पाठलाग करताना रहमनुल्ला गुरबाझने ७१ धावांची खेळी करत अफगाणिस्तानच्या विजयाचा पाया रचला, मात्र दुसऱ्या बाजूने अफगाणिस्तानने सातत्याने विकेट्स गमावल्या. विजय दुरावणार असे चित्र असताना रशीद खानने नाबाद ३७ धावांची खेळी करत अफगाणिस्तानला विजय मिळवून दिला. अष्टपैलू कामगिरीसाठी रशीदला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

पुढच्या वर्षी ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वेत वनडे वर्ल्डकप होणार आहे. यजमान नात्याने हे दोन्ही संघ थेट पात्र ठरले आहेत. या दोन संघांव्यतिरिक्त ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान, बांगलादेश, भारत, इंग्लंड, न्यूझीलंड, पाकिस्तान, श्रीलंका पात्र ठरले आहेत. उर्वरित चार संघ पात्रता फेरीच्या माध्यमातून निवडले जातील.

**वेस्ट इंडिजला थेट पात्रता नाहीच!**

वेस्ट इंडिज क्रिकेटची अधोगती सुरूच राहिली असून सलग तिसऱ्यांदा त्यांना एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेसाठी थेट पात्रता मिळवण्यात अपयश आले आहे. अफगाणिस्तानने आयर्लंडविरुद्ध सलग दोन सामन्यांत विजय मिळवले आणि २०२७च्या विश्वचषकासाठी थेट पात्रता मिळवली. या निकालांचा विंडीजला मोठा फटका बसला असून त्यांचे थेट पात्रतेचे स्वप्न भंगले आहे.

# अजिंक्य रहाणेला निवृत्तीनंतर पहिला फोन सचिनचा!

**मुंबई : प्रतिनिधी**

अजिंक्य रहाणेने नुकतीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. आता ३८ वर्षीय रहाणेने निवृत्तीनंतर मिळालेल्या प्रतिक्रियांबाबत मोठा खुलासा केला आहे. निवृत्तीची घोषणा केल्यानंतर सर्वात आधी महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा फोन आला होता, असे रहाणेने सांगितले.

रहाणेने एका मुलाखतीत म्हटले की, मी निवृत्ती जाहीर केल्यानंतर सर्वात आधी सचिन पाजींचा फोन आला. त्यांना वाटले होते की, मी आणखी बराच काळ खेळेन. मी त्यांना सांगितले मला हे आणखी लांबवायचे नव्हते, कारण मी कोणताही पश्चाताप न ठेवता निवृत्ती घेत आहे.

रहाणे पुढे म्हणाला, इरफान पठाणनेही फोन केला. चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, रोहित शर्मा आणि जसप्रीत बुमराह यांनी मला मेसेज केले. मी सर्वांना एकच गोष्ट सांगितली की, मी समाधानी आहे, कारण मी या खेळाला माझे सर्वस्व दिले.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com